उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थांसाठी ग्राहकांची प्रथम पसंती...
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
VEGETARIAN
राजमोती साबुदाना
एक्स्ट्रॉ सुपरफाइन साबुदाना
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, गुरुवार दि. १८.०७.२०२४ | अंक नं. ११८ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

खरेदीवर आकर्षक गिफ्ट
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर ✆ (0241) 2999299
संगमनेर ✆ (02425) 222226
नारायणगाव ✆ (02132) 242132

सर्वच दिव्यांग प्रमाणपत्रांची चौकशी करा अन्यथा ९ ऑगस्टपासून साखळी उपोषण

सामाजिक संस्थांचा जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे इशारा

नगर –मागील काही वर्षात जिल्हा रुग्णालयामार्फत देण्यात आलेल्या दिव्यांग प्रमाणपत्रांची सखोल चौकशी करून बोगस प्रमाणपत्रे रद्द करावीत तसेच बोगस प्रमाणपत्र देणाऱ्या डॉक्टरांवर कठोर कारवाई करण्यात यावी. सदर कार्यवाही १ ऑगस्टपर्यंत पूर्ण करावी अन्यथा ९ ऑगस्टपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण करण्याचा इशारा अनामप्रेम, राष्ट्रीय दृष्टीहीन संघ, आकांक्षा उद्योगालय, दिव्यदृष्टी संस्था यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

राष्ट्रीय दृष्टीहीन संघ, अनामप्रेम, आकांक्षा उद्योगालय, दिव्यदृष्टी संस्थाच्यावतीने निवासी जिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांना बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांना प्रतिबंध घालावा, या मागणीचे निवेदन देण्यात आले. यावेळी संघाचे अध्यक्ष नितीन सोनार, उपाध्यक्ष किशोर हडोळे, महासचिव श्रीकांत माचवे, सचिव सोमनाथ दरंदले, कौस्तुभ पराई, अनामप्रेमचे रामेश्वर फटांगडे, अभय रायकवाड, उमेश पंडुरे, सचिन गारदे, राहुल खिरोडे, अक्षयकुमार राउत, अमृत भुसारी. (छाया – उदय जोशी)

यासंदर्भात जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात या सामाजिक संस्थांनी म्हटले आहे की, अहमदनगर जिल्हा सामान्य सर्व सामान्य रुग्णालयाने पूजा दिलीप खेडकर (प्रोबेशनरी आयएएस) यांना २०१८ साली अंधत्वाचे प्रमाणपत्र तसेच २०२० साली मानसिक अपंगत्वाचे प्रमाणपत्र दिले होते. या दोन्ही प्रमाणपत्रांची चौकशी करण्याचे आदेश आपण दिले आहेत. यापूर्वीही ७६ शिक्षकांनी नोकरीसाठी, बदलीसाठी बनावट अपंग प्रमाणपत्राचा वापर केला होता. या शिक्षकांवरती काय कारवाई झाली ते समजले नाही. तरीही काही लोकांनी स्वतःच्या स्वार्थासाठी व वेगवेगळ्या शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी बनावट दिव्यांग प्रमाणपत्र मिळवल्याची चर्चा सर्वत्र सुरु आहे.

त्यामुळे ज्यांना अपंगत्व नसताना अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे अशी बनावट अपंग प्रमाणपत्र शोधून ती तात्काळ रद्द करण्यात यावीत. जे खरोखरीच अपंग आहेत त्यांनाच शासकीय सोई सुविधांचा लाभ मिळावा, अपंग प्रमाणपत्र वितरणात पारदर्शकता आणावी, ज्यांच्याकडे बनावट प्रमाणपत्र आढळून आले अशांवर कलम ९१ नुसार कठोर कारवाई करण्यात यावी, खऱ्या अपंगांची प्रमाणपत्र मिळविण्यासाठी होणारी हेळसांड व अपंगांच्या शासकीय योजनांमध्ये होणारी दफ्तर दिरंगाई तात्काळ थांबवावी आदी मागण्या या संस्थांनी केल्या आहेत.

१ ऑगस्टपर्यंत बोगस अपंग प्रमाणपत्र मिळवणाऱ्या व त्यांना प्रमाणपत्र मिळवून देणाऱ्या दोषी डॉक्टरांवर कलम ९१ नुसार दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ प्रमाणे २ वर्ष शिक्षा किंवा रुपये १ लाख दंड अशी कठोरात कठोर कारवाई करावी. अन्यथा खऱ्या अपंगांवर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी ९ ऑगस्टपासून सर्व अपंग जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण व धरणे आंदोलन करतील, असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी संघाचे अध्यक्ष नितीन सोनार, उपाध्यक्ष किशोर हडोळे, महासचिव श्रीकांत माचवे, सचिव सोमनाथ दरंदले, कौस्तुभ पराई, अनामप्रेमचे रामेश्वर फटांगडे, अभय रायकवाड, उमेश पंडुरे, सचिन गारदे, राहुल खिरोडे, अक्षयकुमार राउत, अमृत भुसारी आदी उपस्थित होते.

मोहरम मिरवणुकीत आ.संग्राम जगतापांसमोरच खा. निलेश लंकेंच्या घोषणा

नगर – नगरमध्ये मोहरम निमित्त कत्तलची रात्र मिरवणुकीच्या वेळी बारा इमाम कोठला परिसरात गेलेल्या आ. संग्राम जगताप यांच्यासमोरच अनेक कार्यकर्त्यांनी खा. निलेश लंके यांच्या नावाच्या घोषणा दिल्या. या घोषणाबाजीचा व्हिडीओ शहरात व्हायरल झाला आहे.

नगरमध्ये मोहरमनिमित्त कत्तलची रात्र मिरवणूक मंगळवारी (दि.१६) रात्री काढण्यात आली होती. ही मिरवणूक सुरु होण्याअगोदर सवाऱ्यांचे दर्शन घेण्यासाठी मंगलगेट हवेली, कोठला परिसरात मोठी गर्दी झाली होती. आ.संग्राम जगताप हेही पदाधिकाऱ्यांसह तेथे गेले होते. त्यावेळी काही कार्यकर्त्यांनी त्यांना खांद्यावर उचलून घेतले. त्याचवेळी आ. जगताप यांच्यासमोर अनेक कार्यकर्त्यांनी लंके, लंके अशी घोषणाबाजी सुरु केली. काहींनी या घोषणाबाजीचा व्हिडीओ काढला. हा व्हिडीओ शहरात सोशल मिडीयावर व्हायरल झाला आहे. राजकीय वर्तुळात त्याची जोरदार चर्चा होत आहे.

आ. जगताप व खा. लंके हे काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात एकत्र होते. मात्र लोकसभा निवडणुकीच्या वेळी लंके यांनी शरद पवार गटात प्रवेश करत निवडणूक लढविली. तर आ.जगताप महायुतीत असल्याने त्यांनी भाजपाचे डॉ.सुजय विखे यांचा प्रचार केला होता. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेली आ. जगताप यांच्यासमोर खा. लंके यांच्या नावाची झालेली ही घोषणाबाजी चर्चेचा विषय ठरली आहे.

एस.टी. महामंडळाच्या बसेसची अवस्था खटारा

महामंडळ तसेच शासनाने गांभिर्याने लक्ष घालून सुधारणा करण्याची गरज

नगर – राज्य सरकार एसटी बसवर लाखो – कोट्यावधींची जाहिरात करत आहे. परंतु एसटी बस मधील ड्रायव्हर कॅबिन तसेच पॅसेंजर सिटस्ची दयनीय अवस्था झाली आहे. याकडे कोणालाही वेळ नाही. अनेक बस तर निकामी झाल्या आहेत. त्यामुळे मोठा अपघात होण्याची संभावना आहे. गाड्यांची अवस्था खूपच खराब झाली आहे. जवळपास ८० टक्के जुन्या बस आहेत. तसेच कामे करण्यासाठी लागणारे सुटे भाग उपलब्ध नाहीत. म्हणूनच आगारातून निघाल्यावर बस मोठ्या प्रमाणावर बंद पडत आहेत. बसची टायर रिमोल्ड वापरली जात आहेत. बरेच टायर गुळगुळीत झाले आहेत. काहींच्या तर तारा दिसत आहेत. बसच्या बॉडी अक्षरशः हलतात. मोठा आवाज येतो वरिष्ठांनी लक्ष घालून होणारे धोके टाळावेत.


एसटी महामंडळाच्या बसेस्ची मोठी दुरावस्था झाली असून, चालकाच्या केबिनसह गाडीची झालेली तुटफूट छायाचित्रात दिसत आहे.

प्रवाशांवर सवलतींचा वर्षाव करतांना बससेची अवस्था आणि कर्मचाऱ्यांच्या सोयी सुविधा याकडे वरिष्ठ पातळीवर लक्ष घालून सुधारणार करणे गरजेचे आहे.

काही कारणास्तव एस.टी.बसने प्रवास करण्याचा योग आला. तेथील ग्रामीण भागातील या एसटीची तुलना शहरातील शिवशाही, हिरकणी, व्होल्वोशी केल्यावर हताश झालो. बसचा मूळ साचा, सीट, खिडक्या, अंतर्गत अवस्था पाहिल्यावर जनतेच्या सहनशीलतेला सलाम केला. एसटी महामंडळने या जनतेला किमान माफक सोई सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी अशोक शिंगवी यांनी केली आहे.

या संदर्भात त्यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनाही निवेदन पाठविले आहे.

खडीच्या वाहनाखाली सापडून कामगाराचा मृत्यू

नगर – दगड व खडी वाहतूक करणाऱ्या टाटा कंपनीच्या हायवा या वाहनाखाली सापडून स्टोन क्रशरवरील कामगाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील खंडाळा गावच्या शिवारात असलेल्या एस. आर. स्टोन क्रशरच्या आवारात १७ जुलैला सायं. ४.३० च्या सुमारास घडली. मनोज प्रकाश कुमार (मूळ रा. बुऱ्हाणपूर, मध्यप्रदेश, हल्ली रा. खंडाळा, ता. नगर) असे मयत कामगाराचे नाव आहे. मयत मनोज प्रकाश कुमार हा खंडाळा शिवारात राहुल लोटके यांच्या एस. आर. स्टोन क्रशर येथे कामास होता. बुधवारी दुपारी क्रशरवर वाहन चालक दत्तात्रय मल्हारी वाडेकर (रा. धोंडेवाडी, वाळकी, ता.नगर) हा टाटा कंपनीच्या हायवा घेवून खडी भरण्यासाठी क्रशरवर आला होता. वाहनात खडी भरल्यावर तो तेथून जात असताना त्यांच्या वाहनाखाली सापडून मनोज प्रकाश कुमार हा मयत झाला. या प्रकरणी मयताचा साथीदार दिलीप माधव तडोले (मूळ रा. बुऱ्हाणपूर, मध्यप्रदेश, हल्ली रा. खंडाळा, ता. नगर) याने रात्री उशिरा नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी वाहन चालक दत्तात्रय मल्हारी वाडेकर याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

Career Ki Shuruwat DiSHA ke saath
Accounting & Taxation च्या क्षेत्रात विद्यार्थ्यांची उत्तरोत्तर प्रगती हेच आमचे ध्येय.
An ISO 9001:2015 Certified DiSHA® COMPUTER INSTITUTE
CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COMPUTER APPLICATION | ADVANCE ACCOUNTING
TAXATION, BANKING | AUDITING
100% JOB ASSISTANCE
Experienced Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
Duration : 6 Months
Delhi Gate Branch — 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001 — 9371051769
Old ST stand Branch — 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, A.nagar — 9371151769
Pipeline Branch — Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003 — 7447761769

Require Urgently
Accounts Manager - 1
4 to 5 years experience
Tally Operator - 1
2 to 3 years experience
- Contact -
M. R. BHINGARWALA
Manik Chowk, Ahmednagar
(Sunday Closed)

EARTH's Green Library
Greenery for Every Space
Indoor Plants for your Home!
Get a Plant Today!
Indoor Plants | Potted Planters | Premium Planters
Garden Accessories | Garden Furniture | Garden Lightings
Amit Sanklecha ☎ 99231 43334
Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

मरणोत्तर नेत्रदानाची वाट, अंध जीवनाची चैतन्यमय पहाट...
“मरणोत्तर नेत्रदान करूया, दोन अंधाचे अंध:कारमय जीवन प्रकाशमान करूया..”
स्व.श्री. झुंबरलालजी बोथरा
बोथरा परिवाराच्या योगदानाबद्दल शतशः ऋणी आहोत.
डॉ. कांकरियांचे
साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
मान कन्हैया नेत्रपेढी
वर्धमान, माणिकचौक, अहमदनगर 414001
संपर्क मोबा.: 8888982222 / 9112288611

ENJOY YOUR HOLIDAY AT
Manali
Volvo Package
3 Nights Accommodation
Breakfast | Dinner | Sightseeing by Private Car | Ex. Delhi
@ Just Rs. 6999/- PP
Limited Offer
July & August 2024
AMAR PREM Holidays & Multiple services
For more details Contact : 9226399555 9657746555
Pune : 9168055159 / 9819927017
Nashik 9822281125 / 8149324403
Jalna : 9595150999
Kada : 7030034041 / 9423471413

आकर्षक टॉईजवर
२५% सूट
आर.एन.आर्ट अ‍ॅण्ड क्राफ्ट
गिफ्ट अ‍ॅण्ड स्कूल स्टेशनरी । होलसेल अ‍ॅण्ड रिटेलर
एक्सक्लुझिव्ह गिफ्ट, पर्सनालाईझड गिफ्ट अ‍ॅण्ड टॉईज
काका खवावालासमोर, नेता सुभाष चौक, चितळेरोड, अ.नगर-४१४००१
मो : 9325329061/ 9373417113

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

टाइम ॲण्ड सेल्फ मॅनेजमेंट – कांचन दीक्षितांचे पुस्तक वाचा

आजच्या पिढीला, प्रत्येक सुशिक्षित उद्योजक, व्यावसायिक व उच्चपदस्थ नोकरदारांसाठी वेळ व व्यवस्थापन अत्यंत महत्वाचे वाटते व आहे सुद्धा. बऱ्याचदा काही जुजबी माहिती असणाऱ्यांना आपल्याला खूप ज्ञान, अनुभव आहे असे वाटते. हे पुस्तक वाचल्यावर हा भ्रम दूर होईल.

या पुस्तकाच्या लेखिका कांचन दीक्षित या स्वतः टाइम ॲण्ड सेल्फ मॅनेजमेंटच्या प्रशिक्षक आहेत. विविध वयातील, निरनिराळ्या आर्थिक–सामाजिक स्तरावरील वाचकांना या पुस्तकात खूप काही मिळेल.

पुस्तकातील प्रत्येक प्रकरण प्रेरणादायी आहे. यातील व्यवसाय, उद्योग आणि उर्जासम प्रकरणे एखाद्या सामान्य व्यक्तीला एक उत्तम व्यावसायिक बनवू शकते. नोकरीच्या मागे लागण्यापेक्षा युवा मित्रांनी अशा पुस्तकांची प्रेरणा, प्रोत्साहन घेऊन स्वयंरोजगाराचा प्रयत्न करायला पाहिजे. हे पुस्तक गृहिणी, युवतींनाही आपण काहीतरी करावे, स्वतः मोठे व्हावे असे सांगते.

नियोजनपूर्वक, नकळतपणे अनेक गोष्टी यातून समजतात. म्हणूनच केवळ ८ महिन्यात याची पाचवी आवृत्ती आली आहे.

साधा पण महत्त्वाचा सल्ला पहा. तुम्हाला लवकर उठायचे असेल तर रात्री वेळेवर झोपायला अलार्म लावा. विविध शास्त्रांतील कौशल्याचा परामर्श घेतलेले हे पुस्तक संग्रही ठेवा व प्रियजनांना भेट देऊ शकता.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : “मुसाफिर”–९८२२०२०६९१



रस्त्याच्या ‘अर्धवट’ व ‘निकृष्ट’ कामामुळे अपघात आणि गैरसोयींनी रहिवाशी त्रस्त

चेंबर, पाईपलाईनची तोडफोड, शासकीय निधीची वारेमाप उधळपट्टी

नगर – सावेडी उपनगरात रस्त्याच्या अर्धवट कामामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, अपघाताच्याही घटना वारंवार घडत आहेत. ठेकेदाराकडुन सुरक्षेच्या कोणत्याही उपाययोजना न करता काम केले जात असल्याने रहिवाशांना प्रचंड गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.

समतानगरमधील नीलशंकर कॉलनीत सध्या रस्त्याचे काम सुरू आहे. काम करताना संबंधित ठेकेदाराने जुने चेंबर पाडून टाकले. परंतु नवीन चेंबर बांधले नसल्याने ड्रेनेजलाईनची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली आहे. पाण्याची पाईलपाईनही अनेक ठिकाणी तोडण्यात आली आहे. त्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून, पिण्याच्या पाण्यासाठी रहिवाशांना तिष्ठावे लागत आहे. रस्त्याचे काम करणारे कामगार येथील रहिवाशांकडे पैशांची मागणी करत आहेत. पाईपलाईन चेंबर दुरुस्त करण्यासाठी पैसे मागितले जात असल्याची तक्रार नागरिक करत आहेत.

विशेष म्हणजे रस्त्याचे काम अर्धवट झालेले असल्याने सर्वत्र खडी, विटा, दगड, माती असा राडा पडलेला आहे. त्यावरून ये–जा करताना अपघाताच्या घटना घडत आहेत. आतापर्यंत अनेक दुचाकीस्वार या रस्त्यावर पडून जखमी झाले आहेत. अनेकांना मोठी दुखापत झाली आहे. वृद्ध, महिला, मुले यांच्यासाठी हा रस्ता धोकादायक बनला आहे. या रस्त्यावर पडून एखाद्यास गंभीर दुखापत अथवा एखादा बळी गेल्यास त्यास जबाबदार कोण? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

सदर रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत आहे. नागरिकांच्या करातून आलेल्या पैशाची उधळपट्टी करण्याच्या एकमेव उद्देशाने रस्त्याचे काम निकृष्ट केले जात असून, प्रशासनाने याबाबत गांभीर्याने दखल घेऊन चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी नागरिक करत आहेत.


समतानगरमधील नीलशंकर कॉलनीत सुरू असलेल्या रस्त्याच्या निकृष्ट कामामुळे होणारे अपघात, रस्त्याची झालेली दुरावस्था आणि सर्वत्र झालेला राडा छायाचित्रात दिसत आहे.

उपनगरात दोन ठिकाणी घरफोड्या; सोन्या–चांदीचे दागिने व रोकड लंपास

नगर – बोल्हेगाव फाटा तसेच गजानन कॉलनी परिसरात असलेली दोन घरे अज्ञात चोरट्यांनी फोडून सोन्या – चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरून नेल्याच्या घटना घडल्या आहेत. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात २ स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

यातील पहिली फिर्याद सुरजबाई श्रीपाद कोठारी (वय ६९, रा. गजानन कॉलनी, नवनागापूर) यांनी दिली आहे. फिर्यादी यांचे गजानन कॉलनीत घर असून मंगळवारी (दि.१६) सायंकाळी त्याला कुलूप लावून त्या मातोश्रीनगर येथे असलेल्या दुसऱ्या घरी गेल्या होत्या. बुधवारी (दि.१७) सकाळी त्या पुन्हा घरी परतल्या तेव्हा त्यांना घराचे कुलूप तुटलेले दिसले. त्यांनी घरात जावून पाहणी केली असता सर्वत्र उचकापाचक केलेली दिसली. त्यांनी घरातील कपाटाची पाहणी केली असता अज्ञात चोरट्यांनी कपाटातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ५२ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी पोलिसांना माहिती देत फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

दुसरी फिर्याद भाऊसाहेब सावळेराम शेलार (रा. विजय नगर, बोल्हेगाव फाटा) यांनी दिली आहे. फिर्यादी हे कामानिमित्त मंगळवारी (दि.१६) सकाळी ११ वाजता बाहेरगावी गेलेले होते. ते बुधवारी (दि.१७) सायंकाळी घरी परतले असता त्यांना घराचे कुलूप तुटलेले दिसले. त्यांनी घरात जावून पाहणी केली असता सर्वत्र उचकापाचक केलेली दिसली. त्यांनी घरातील कपाटाची पाहणी केली असता अज्ञात चोरट्यांनी कपाटातील अर्धा तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र व ४ हजारांची रोख रक्कम असा २२ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी पोलिसांना माहिती देत फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

विजेचा शॉक बसून कामगाराचा मृत्यू

नगर – एमआयडीसी तील कंपनीत काम करत असलेल्या कामगाराला विजेचा शॉक बसल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना राजगुरू इंडस्ट्रीज या कंपनीत बुधवारी (दि.१७) दुपारी घडली. बसंतसिंग (वय ४२, रा. साईनगर, नवनागापूर)असे या मयत कामगाराचे नाव आहे. मयत बसंत सिंग हे बुधवारी (दि.१७) दुपारी एमआयडीसी तील राजगुरू इंडस्ट्रीज या कंपनीत काम करत होते. तेथे त्यांना विजेचा शॉक बसून ते बेशुद्ध पडले. तेथील कामगारांनी त्यांना उपचारासाठी दुपारी २.३० च्या सुमारास जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. बटुळे यांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबतची माहिती एमआयडीसी पोलिस ठाण्यात देण्यात आली. या माहितीवरून पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

नगर तालुक्यात २० जुलै रोजी रंगणार बैलगाडा शर्यतीचा थरार

नगर– नगर तालुक्यात सलग दुसऱ्या वर्षी बैलगाडा शर्यतीचा थरार रंगणार असून शनिवारी (दि. २० जुलै) भोरवाडी येथे नगर तालुका केसरी बैलगाडा शर्यत होणार आहे. या शर्यतीमध्ये विजेत्यांवर मोटारसायकल, फ्रीज, एलईडी टीव्ही, कुलर या वस्तूंसह रोख अशा लाखो रुपयांच्या बक्षीसांचा धुरळा उडणार आहे.

न्यायालयाने बैलगाडा शर्यतीवरील बंदी हटवल्याने आता राज्यात व देशभरात बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले जात आहे. मात्र नगर तालुक्यात इतिहासात गतवर्षी प्रथमच बैलगाडा शर्यतीचे आयोजन भोरवाडी येथील श्री.हनुमान सप्ताह यात्रा उत्सवानिमित्त राहुल जाधव युवा मंच च्या वतीने करण्यात आले होते. सकाळी ९ वाजेपासून सुरु झालेला हा चित्तथरारक शर्यतींचा थरार तब्बल १० तास रंगला. या मध्ये १९० गाडामालकांनी सहभाग घेतल्याने या शर्यती साठी सुमारे ८०० बैल आणि २०० घोडे आणण्यात आले होते. दिवस भरात जिल्ह्यातील हजारो प्रेक्षकांनी या शर्यती पाहण्यासाठी भोरवाडी येथे हजेरी लावली होती.

आता या वर्षी पुन्हा शनिवारी (दि. २०) नगर तालुका केसरी बैलगाडा शर्यत होणार आहे. या बैलगाडा शर्यतीचे विशेष आकर्षण म्हणजे विजेत्या गाडा मालकांना मोटारसायकल, फ्रीज’ एलईडी टीव्ही कुलर व रोख रक्कम अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत. या शिवाय घाटाचा राजा तसेच फळी फोड साठीही रोख बक्षिसे दिली जाणार आहेत.

बैलगाडा शर्यतीला परवानगी मिळाल्यापासून नियम–अटींची पूर्तता करीत या शर्यती पार पडल्या जात आहेत. राज्यात ठिकठिकाणी शर्यतीच्या आयोजनामुळे ग्रामीण अर्थकारणावर अनुकूल परिणाम झाला आहे. शर्यतीच्या ठिकाणी लाखोंची उलाढाल होत आहे तर बैलजोडीला पुन्हा महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे खिलार बैलजोडीच्या किंमती या लाखोंच्या घरात गेल्या आहेत. अशातच नगर तालुक्यात भोरवाडी येथे आयोजित केल्या जाणाऱ्या या बैलगाडा शर्यती बाबत मोठी उत्सुकता आहे.

अधिक माहितीसाठी राहुल जाधव (मो. ९५९५२४२४७२) तसेच राहुल जाधव युवा मंचचे अध्यक्ष मो. ९७३०५१४१४१, उपाध्यक्ष मो. ७२७६७७६९७६ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

रवि भोसले यांचे हृदयविकाराने निधन

नगर – बालिकाश्रम रोड, नायरा पेट्रोल पंपा मागे, दुर्वांकूर अपार्टमेंट येथील रहिवासी रवि शिवाजीराव भोसले (वय ५२) यांचे १८ जून रोजी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, १ भाऊ, भावजय असा परिवार आहे. सचिन भोसले यांचे ते मोठे बंधू तर शिवम भोसले यांचे वडील होत.

बलभीम जाधव यांचे अल्प आजाराने निधन

नगर – चिचोंडी पाटील (ता. नगर) येथील रहिवासी बलभीम बाबुराव जाधव (वय ७५) यांचे १८ जुलै रोजी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, सुन, नातवंडे असा परिवार आहे. संतोष जाधव यांचे ते वडील होत.

रामदास पांगारकर यांचे हृदयविकाराने निधन

नगर – बुऱ्हाणनगर येथील रहिवासी रामदास मोरेश्वर पांगारकर (वय ८७) यांचे १७ जुलै रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर तळेगाव दाभाडे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

ते भागवत सप्ताह कार्यक्रमात प्रवचन करीत. त्यांच्या पश्चात पत्नी, अरुण व श्रीपाद पांगारकर ही २ मुले, विनायक व मिलिंद पांगारकर हे २ पुतणे, माधुरी व इंदुमती या मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

निवृत्त शिक्षिका सौ. सुमन कडूस यांचे अल्प आजाराने निधन

नगर – सारोळा कासार येथील रहिवासी निवृत्त शिक्षीका सौ. सुमन कडूस (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्या रयतचे निवृत्त प्राचार्य भाऊसाहेब कडूस यांच्या पत्नी तर वरिष्ठ विकास अधिकारी, आरोग्य विमा राम कडूस व नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठीतील पशुवैद्यक शास्त्रज्ञ डॉ. श्याम कडूस यांच्या मातोश्री होत.

त्यांच्या पश्चात तीन मुली, दोन सुना, पुतणे, नातंवड असा परिवार आहे. त्यांनी सारोळा कासार, विसापूर, घोसपुरी, बोल्हेगाव येथे सेवत असतना पंचक्रोशीतील अनेक विद्यार्थी घडविले. सेवानिवृत्तीनंतर त्यांचे हे काम अविरत पणे सुरू होते. त्या धार्मिक वृतीच्या मनमिळावू स्वभावाच्या होत्या. परिसरात ‘कडूस मॅडम’ म्हणून परिचीत होत्या.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

महसूल कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला पाठिंब्याचे पत्र देताना महाराष्ट्र राज्य नगर परिषद संवर्ग अधिकारी संघटनेचे पदाधिकारी.

महसूल कर्मचारी संघटनेच्या आंदोलनाला नगर परिषद अधिकारी संघटनेचा पाठिंबा

नगर – विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र आंधळे, माजी अध्यक्ष भाऊसाहेब डमाळे व उपाध्यक्ष अशोक मासाळ, संतोष झाडे, जिल्हा सरचिटणीस स्वप्निल फलटणे, अक्षय फलके यांच्या नेतृत्वाखाली काम बंद आंदोलन करून जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर निदर्शने करण्यात आली. चौथ्या दिवशी महाराष्ट्र राज्य नगरपरिषद संवर्ग अधिकारी संघटनेच्या वतीने महसूल कर्मचारी संघटनेच्या आंदोलनास पाठिंब्या पत्र महसूल अध्यक्ष आंधळे, उपाध्यक्ष मासाळ यांना देण्यात आले यावेळी महाराष्ट्र राज्य नगरपरिषद संवर्ग अधिकारी संघटनेचे नाशिक विभागाध्यक्ष महेंद्र कातोरे, अहमदनगर जिल्हा अध्यक्ष योगेश्वर खैरे, महेश काकडे, विजय बडे, योगेश मेंढे, ज्ञानेश्वर जगताप, प्रशांत घुमे आदीसह महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य नगरपरिषद संवर्ग अधिकारी संघटनेच्या वतीने पाठिंबा जाहीर केला पत्रात म्हटले आहे की, निवडणुका, आपत्ती व्यवस्थापन व अन्य शासकीय कामकाज महसूल विभाग आणि नगर विकास विभाग अंतर्गत नगरपरिषद/नगरपंचायती यांच्या समन्वयातून नेहमीच पार पाडले जाते. विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आणि नगरपरिषद /नगरपंचायतीमध्ये महाराष्ट्र नगरपरिषद राज्य संवर्ग अधिकारी कार्यरत आहे. सदर अधिकाऱ्यांच्या कामकाजाचे निमित्ताने विभागासोबत नेहमीच संपर्क येत असतो. त्यामुळे आपण केलेल्या मागण्या या नियमोचित आहेत. मागण्या शासनाने यथाशीघ्र मान्य कराव्यात. त्यामुळे महाराष्ट्र राज्य नगरपरिषद संवर्ग अधिकारी संघटनेच्या वतीने जाहीर पाठिंबा दर्शवण्यात येत असल्याचे पत्रात म्हटले आहे.

९ जणांच्या टोळीने व्यावसायिकाला महामार्गावर मारहाण करत लुटले पिस्तुल, दागिने व रोकड पळविली

नगर – सोलापूर महामार्गावरील घटना

नगर – नगर – सोलापूर महामार्गालगत असलेल्या वाटेफळ (ता. नगर) शिवारात रस्त्याच्या कडेला लघुशंकेसाठी थांबलेल्या व्यावसायिकाला व त्याच्या मित्राला ९ दरोडेखोरांच्या टोळीने मारहाण करत त्यांच्या जवळील सोन्याचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल असा २ लाख ३१ हजारांचा ऐवज तसेच परवाना असलेला पिस्तुल पळवून नेल्याची घटना मंगळवारी (दि.१६) सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत निखील संजय अच्छा (वय ३४, रा. शिक्षक कॉलनी, रामलिंग रोड शिरूर, जि. पुणे) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात बुधवारी (दि.१७) फिर्याद दिली आहे. फिर्यादी अच्छा यांचा गोळ्या बिस्किटे होलसेल विक्रीचा व्यवसाय आहे. या व्यवसायानिमित्ताने ते मंगळवारी दुपारी वाटेफळ जवळच असलेल्या बीड जिल्हा हद्दीतील काही गावांत गेले होते. तेथून परतत असताना वाटेफळ शिवारात नगर – सोलापूर महामार्गापासून काही अंतरावर रस्त्याच्या कडेला चारचाकी गाडी उभी करून लघुशंकेसाठी थांबले होते.

त्यावेळी त्यांच्या समवेत त्यांचे मित्र अरुण मधुकर कानडे हे ही होते. हे दोघे गाडीतून खाली उतरल्यावर जवळच असलेल्या शेतातून ९ दरोडेखोरांची टोळी आली. त्यांनी दोघांना मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच त्यांना धमकावत त्यांच्या जवळील सोन्याच्या अंगठ्या, चेन रोख रक्कम असा २ लाख ३१ हजारांचा ऐवज तसेच त्यांच्या जवळ परवाना असलेला पिस्तुल पळवून नेला.

तपास अंभोरा पोलिसांकडे वर्ग

या घटनेने घाबरलेल्या फिर्यादी यांनी तातडीने शिरूर ला जावून पोलिस ठाण्यात घडलेला प्रकार सांगितला. ही घटना नगर तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडलेली असल्याने शिरूर पोलिसांनी त्यांना नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद देण्याचा सल्ला दिला. त्यानुसार त्यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी निखील अच्छा यांच्या फिर्यादी वरून अज्ञात ९ दरोडेखोरांविरोधात दरोड्याचा गुन्हा दाखल केला. स.पो.नि. प्रल्हाद गिते व पोलिस उपनिरीक्षक रणजीत मारग यांनी फिर्यादी व पोलिस पथकासह घटनास्थळी भेट दिल्यानंतर सदर घटना ही बीड जिल्ह्यातील अंभोरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे नगर तालुका पोलिसांनी सदर गुन्हा तपासासाठी अंभोरा पोलिसांकडे वर्ग केला आहे.

राज्यातील कामगार वेतनवाढीचा निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलन

नगर – महाराष्ट्रातील साखर उद्योग व साखर उद्योगाशी संलग्न जोडधंद्यातील कामगारांच्या वेतनवाढ व सेवाशर्ती बाबतच्या राज्य पातळीवरील कराराची मुदत ३१ मार्च रोजी संपलेली आहे. सहकार मंत्री व अन्य संबंधितांची साखर आयुक्तांनी २५ जुलै पुर्वी साखर कामगारांच्या पगार वाढीसाठी तत्काळ बैठक आयोजित करुन निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यातील लाखोच्या संख्येने साखर कामगार तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघाचे सहचिटणीस कॉ. आनंद वायकर यांनी दिला.

यावेळी प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे व शंकरराव भोसले, महासंघाचे उपाध्यक्ष सत्यवान शिखरे, खजिनदार शिवाजी कोठवळ, संदीप मालुंजकर, विजय देशमुख, रावसाहेब वाकचौरे, आनंदा भसे, डी.एम. निमसे, अशोक पवार यांच्या नेतृत्वाखाली साखर कामगारांच्या शिष्टमंडळाने साखर आयुक्त कुणाल खेमनार यांची भेट घेऊन चर्चा केली आणि राज्यातील साखर कामगारांच्या वतीने महासंघ व प्रतिनिधी मंडळाच्या वतीने कामगारांच्या मागण्यांचे निवेदन दिले.

यावेळी दोन्ही राज्यव्यापी संघटनांचे अन्य प्रतिनिधी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघाने राज्यातील साखर कारखान्यांमध्ये महासंघ व प्रतिनिधी मंडळ यांच्या संघटना कार्यरत आहेत, तेथील लाखोच्या संख्येने या संघटनांचे सभासद कार्यरत आहेत. महासंघाचे कायद्यातील तरतुदी प्रमाणे राज्य पातळीवरील झालेल्या कराराची मुदत संपल्याने २३/२/२०२४ रोजी तसेच ५/३/२०२४ रोजी नवीन मागण्यांची नोटीस व ६/३/२०२४ रोजी कामगार प्रतिनिधींची यादी शासनासह कामगार आयुक्त, राज्य सहकारी साखर कारखाना संघ व साखर आयुक्त यांना दिली आहे. असे असुनही अद्यापपर्यंत त्रिपक्ष समिती गठित झालेली नाही. त्यामुळे साखर कामगारांमध्ये असंतोष असुन त्याचा केव्हाही उद्रेक होऊ शकतो असा इशाराही देण्यात आलेला आहे. शिवाय येणाऱ्या सन २०२४– २०२५ च्या गळित हंगामावर विपरीत परिणाम झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शासनावर राहील असे स्पष्ट करण्यात आले.

राज्यातील कामगार वेतनवाढ करावी या मागणीचे निवेदन साखर आयुक्त यांना देताना महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघाचे पदाधिकारी.

पगार थकविणाऱ्या कारखान्यांना ऊस गाळप परवाना देण्यात येऊ नये

साखर कामगारांचे बऱ्याच कारखान्यांमध्ये पगार थकित आहेत, या सर्व कारखान्यांतील कामगारांचा थकित पगार लवकरात लवकर देऊन पेमेंट ऑफ वेजेस् कायद्यातील तरतुदीप्रमाणे दरमहा १० तारखेच्या आत पगार करणेबाबत सर्व कारखान्यांना साखर आयुक्तालयामार्फत कळविण्याची मागणी चर्चेत करण्यात आलेली आहे. तसेच राज्यातील काही कारखाने उच्चांकी गाळप करुन सुद्धा कामगारांचे पगार थकवितात. अशा कारखान्यांना तत्काळ पगार करण्याविषयी योग्य त्या सुचना साखर आयुक्तांनी देण्याची मागणी करीत पगार थकविणाऱ्या कारखान्यांना ऊस गाळप परवाना (क्रसिंग लायसेन्स) देण्यात येऊ नये अशीही मागणी करण्यात आल्याचे बैठकीनंतर महासंघाचे सहचिटणीस कॉ. आनंदराव वायकर यांनी सांगितले. बंद, आजारी कारखान्यांबाबत शासनाकडून भरीव मदत देऊन हे कारखाने चालु करण्यात येऊन त्या कारखान्यातील कामगारांना त्यांचे थकित वेतन, उपदान व प्रॉ. फंडाचा रकमा भरण्यात याव्यात. कारखाने चालु करण्यासाठी शासनाने लवकरात लवकर निर्णय घेऊन येत्या हंगामात बंद पडलेले कारखाने चालु करून तेथील कामगारांना वेळेवर पगार व थकित देणी देण्यासाठी शासनाने योग्य ती पावले उचलावी असेही कॉ. वायकर यांनी सांगितले.

गृहिणी

आरोग्य

मधुमेहींसाठी काकडी वरदान

सकाळी उठल्यावर डोकं दुखत असेल तर किंवा फ्रेश वाटत नसेल तर रात्री झोपण्यापूर्वी काकडीच्या फोडी खाव्यात. मधुमेहींसाठीसुद्धा काकडी उपयुक्त आहे. काकडीत असलेल्या स्टेरॉल्समुळे कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित करायला मदत होते. काकडीत पोटॅशिअम, मॅग्नेशिअम आणि फायबर असल्यामुळे रक्तदाब सुरळीत राहण्यास मदत होते. तसेच स्नायूंचे दुखणे, पायात वात येणे यासारखे विकार दूर करण्याची क्षमता यात असते.

पाककला

टोमॅटोचे लोणचे

साहित्य – चारशे ग्रॅम लाल मोठे टोमॅटो, दहा–पंधरा लाल सुक्या मिरच्या, दहा–बारा लसूण पाकळ्या बारीक चिरून, एक मोठा चमचा चिंचेचा कोळ, चवीला मीठ, अर्धी वाटी चिरलेला गूळ, दोन मोठे चमचे तेल फोडणीसाठी, मोहरी, हिंग, हळद, चिमूटभर मेथी पूड.

कृती – चिंचेचा कोळ, थोडे पाणी आणि मिरच्या घालून एक–दोन मिनिटे उकळावा. गार झाल्यावर मिक्सरमधून फिरवून एकजीव करावा.

दोन–तीन वाट्या उकळत्या पाण्यात टोमॅटो घालून पाच मिनिटे झाकून ठेवावे. साले काढून तुकडे करून घ्यावे. तेलाची फोडणी करावी. त्यात मेथी पूड, चिरलेला लसूण आणि मिरच्या घातलेला चिंचेचा कोळ घालून परतावे, टोमॅटो मीठ, गूळ घालून उकळून घट्ट करावे.

वास्तू

शांत झोपेसाठी

✻ बॉक्सबेड शक्यतो नसावा. तसेच, त्यात अंथरुण व पांघरुणे ठेवलेली असल्यास ती वारंवार बाहेर काढून धुवून, वाळवून पुन्हा आत ठेवावीत. यात पितळी किंवा स्टेनलेस स्टीलची जास्तीची भांडी, विजेची उपकरणे, नादुरूस्त वस्तू ठेवू नयेत. कारण त्यामुळे त्यावर शांत झोप लागत नाही.

✻ स्टडी टेब ल भिंतीला चिकटलेले असावे व त्याचे बुकशेल्फ बंद असावे.

सल्ला

बेसनात ब्रेड दूधात भिजवून मिसळावा व त्या बेसनाची भजी बनवावीत. भजी स्वादिष्ट, कुरकुरीत होतील.

सौंदर्य

✻ ऑलिव्ह ऑईलमध्ये थोडासा संत्र्याचा रस घालून त्याने सुद्धा मालिश करावे. यामुळे त्वचेला 'क' आणि 'ई' जीवनसत्व मिळते.

✻ दह्यामध्ये काकडी किसून ते चेहऱ्यावर लावा. यामुळे सनटैन दूर होतो व त्वचा मुलायम होते.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १९ जुलै २०२४

प्रदोष, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, मूळ २६।५५, सूर्योदय ०६ वा. २७ मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.

राशिभविष्य

मेष : आज आपल्या आयुष्यात आपल्या नातलागांची व मित्रांची चांगली भूमिका रहाणे शक्य आहे. योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल.

वृषभ : आजचा दिवस व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. मित्रांचा अनुकूल सहयोग मिळेल. घरातील वातावरण आनंददायी राहील. घराबाबत काही योजना बनवाल. नवीन जोखिम असलेली कार्ये टाळा.

मिथुन : प्रेमीजनांसाठी आजचा दिवस आनंदाने परिपूर्ण असेल. नवी सुरुवात कराल आणि पूर्ण विश्वासाने त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न कराल. प्रिय व्यक्तीबरोबर संवाद होईल. आवश्यक कार्य देखील पूर्ण होतील.

कर्क : कार्यात यश मिळविण्यासाठी आपले मत ठामपणे मांडाल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागतील. कौटुंबिक प्रश्नांची उत्तरे मिळतील. मित्रांचा पाठिंबा मिळेल.

सिंह : नोकरदार व्यक्तींना कामात अनुकूल वातावरण मिळेल. आपली इच्छा असेल तर दिवास्वप्नही खरी ठरू शकतात. बळात वाढ होईल. लोकांबरोबर काही विषयांवर संमती द्यावी लागू शकते.

कन्या : आपणास आज संभाषणात काळजी घेण्याची गरज आहे. देवाण–घेवाण टाळा. आनंददायी क्षण आयुष्यभर स्मरणात रहातील. अधिकारी वर्गाचा पाठिंबा मिळेल. व्यापार–व्यवसायासाठी छान दिवस.

तूळ : स्वतःला इतर लोकांसमोर सादर करण्याचे सामर्थ्य अंगी येईल. इतर लोकांना तुमचे विचार पटतील. आर्थिक विषयांमध्ये सावगिरी बाळगा. धावपळ जास्त होईल.

वृश्चिक : महत्वाच्या एखाद्या सामुदायिक योजनेत इतर लोकांबरोबर आपले सहकार्य तुमची उत्तम राजकीय जाण दाखवेल. वेळ अनुकूल आहे. पत्नीशी बोलल्यानंतर मूड छान होईल.

धनु : आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. राजकीय विषयांमध्ये स्थिती आनंददायी राहील. सुख–शांतीचे वातावरण राहील. हुशारीने गुंतवलेले धन आपणास ध्येयाजवळ घेऊन जाईल.

मकर : अधिकार क्षेत्र वाढेल. शत्रूंना भीती वाटेल. आनंद वाढेल. उत्साहजनक वार्ता मिळतील. यापार–व्यवसायात कौटुंबिक सभासदांचा सहयोग मिळेल.

कुंभ : आरोग्य उत्तम राहील. देवाण–घेवाण काळजीपूर्वक करा. अत्यंत व्यस्त राहाल. शत्रूंवर प्रभाव वाढेल. लेखन कार्यात प्रगती होईल. शत्रूंपासून सावध राहा. हसत खेळत वेळ जाईल.

मीन : मुलांवर खर्च होईल. कौटुंबिक प्रश्नांची उत्तरे मिळतील. वेळेचे भान पाळा. वाहने काळजीपूर्वक चालवा. मानसिक सुख–शांतीचे वातावरण राहील. जोखिम असलेल्या कार्यांमध्ये गुंतवणूक करू नये.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

फिल्मीचक्कर क्र. ११४७

सौ. शैलजा कुलकर्णी

१	२	३		४		■	५
६			■		■	७	■
	■		■	८	९		१०
११	१२	■	१३	■		■	
१४					■	■	
	■	■	■	■	१५		
१६		१७		१८	■	■	
	■		■		■	१९	

आडवे शब्द :– १) 'शोले' चित्रपटात गब्बरसिंगची भूमिका करणारा दिवंगत अभिनेता ५) ये दिल + के मानता नही (चित्रपटाचे नाव) ६) उष्ण; तापलेले ८) धर्मेंद्र, लीना चंदावरकर, जगदीप यांच्या भूमिका असलेला एक चित्रपट ११) ++ कितनी अच्छी हो तुम कितनी भोली हो (गाणे) १४) विनोद खन्ना, लीना चंदावरकर, ओमप्रकाश, जीवन, राजेंद्रनाथ यांचा एक चित्रपट १५) यात राजेश खन्ना, अमिताभ बच्चन यांच्या भूमिका आहेत १६) मेरे मन की गंगा और तेरे मन की जमुना का बोल राधा बोल संगम ++ + ++ (गाणे) १९) जीने की ++ (चित्रपटाचे नाव)

उभे शब्द :– १) राजेश खन्ना, रेखा यांचा एक चित्रपट २) छोटीसी उमर मे लग गया रोग कहते है लोग मै ++ जाऊं ओ मै मर जाऊं (गाणे) ३) गंगा +++ (चित्रपटाचे नाव) ४) आप के +++ (चित्रपटाचे नाव) ७) ++ का इन्साफ (चित्रपटाचे नाव) ९) आखरी ++ (चित्रपटाचे नाव) १०) अमिताभ बच्चन, मनीषा कोईराला, जॅकी श्रॉफ, शिल्पा शेट्टी, रघुवरन, अमरीश पुरी, मुकेश ऋषी १२) मेरे ++ की गंगा और तेरे मन की जमना का (गाणे) १३) ++ काटकर (एक अभिनेत्री) १७) एक दिवगंत विनोदी अभिनेता – ++ मुखर्जी १८) ++ रांझा (चित्रपटाचे नाव)

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : जे आपली प्रशंसा करतात ते लोक आपल्याला आवडतात, पण आपण ज्यांची प्रशंसा करतो ते लोक आपल्याला आवडत नाहीत.

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

माणसाला किती दात असतात

प्रौढ माणसाला एकूण ३२ दात असतात. वरील जबड्यात सोळा व खालच्या जबड्यात सोळा. यात निम्मे दात डाव्या बाजूला व निम्मे उजव्या बाजूला असतात. वरच्या व खालच्या जबड्यातील प्रत्येकी सोळा दातांमध्ये पटाशीचे चार दात, दोन सुळे, चार उपदाढा व सहा दाढा असे दात असतात. माणसाच्या बाबतीत खायचे व दाखवायचे दात वेगळे नसतात. मग भले एखाद्याला कोणी काहीही म्हणो!

उत्क्रांतीच्या टप्प्यामध्ये माणसाच्या जबड्याचे हाड लहान होत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस शेवटी येणाऱ्या दाढांसाठी (अक्कल दाढांसाठी) जबड्यात जागाच शिल्लक राहत नाही. त्यामुळे कधी कधी ह्या दाढा उगवतच नाहीत.

कधी वेड्यावाकड्या येतात. त्या जर गालाच्या दिशेने उगवू लागल्या तर खूप त्रास होतो व त्या काढून टाकाव्या लागतात.

कालांतराने सर्व मानवांना २८ दात असण्याची शक्यता नाकारता येत नाही. थोडक्यात म्हणजे आधुनिक मानवाला अक्कलदाढांची गरज नाही. हे निसर्गाच्या ध्यानात आले असावे.

अक्कलदाढा व अक्कल यांचा तसा अर्थाअर्थी काहीच संबंध नसल्याने घाबरून जाण्याचे कारण नाही!

कोल्ह्याने केला डाव

एक सिंह मरायला टेकला असता आपल्यानंतर आपल्या राज्याची व्यवस्था चांगल्या प्रकारे पाहणारा वारस आताच निवडून ठेवावा, असे त्याच्या मनात आले. म्हणून त्याने सर्व प्राण्यांची सभा भरविली. प्रत्येकाने आपले कसब दाखवावे, असे त्याने सांगताच प्रत्येक प्राणी आपली कला सिंहापुढे पेश करू लागला, पण त्याचे समाधान झाले नाही. तेवढ्यात वानराने आडव्या तिडव्या उड्या मारल्या, नकला करून दाखविल्या, त्यामुळे सिंहाला हसू आवरेना. थोडा वेळ तो मरणाच्या यातना विसरला आणि त्याने जाहीर केले, ''मी मेल्यानंतर हा वानर तुमचा राजा होईल. सर्वांनी त्याच्या आज्ञेत राहावे.'' सर्वांनी माना डोलावल्या.

दुसऱ्याच दिवशी सिंह मरण पावला. वानर गादीवर बसला आणि राज्यकारभार पाहू लागला. पण कोल्ह्याला याचा खूप राग आला. आपल्याला डावलून या वानराला राजा केले, हे पाहून त्याचा जळफळाट झाला. वानराला कसल्या तरी संकटात टाकून राज्य बळकावून घ्यावे, असे त्याच्या मनात आले. तो संधीची वाट पाहू लागला. एकदा त्याने पारध्याने सापळा लावलेला पाहिला. मग त्याने शेतातील थोडी फळे चोरून आणली आणि सापळ्याच्या खाली टाकली. वानराजवळ येत म्हणाला,'' महाराज, तुम्हाला फळे फारच आवडतात, हे मला माहीत आहे. चला माझ्याबरोबर.'' असे म्हणत वानराला सापळ्याजवळ नेले आणि त्याखालची फळे दाखविली. फळे पाहून वानराच्या तोंडाला पाणी सुटले. आपला काटा काढण्यासाठी कोणी तरी टपून आहे, हे काही त्याच्या लक्षात आले नाही. फळे घेण्यासाठी त्याने आत हात घालताच सापळ्यातील चापात त्याचा हात अडकून बसला. ते पाहून कोल्हा फिदीफिदी हसत म्हणाला,'' असला रे कसला राजा तू? तुला सापळासुद्धा ओळखता येत नाही.''

तात्पर्य : अंगी सामर्थ्य नसताना उच्चपदी बसल्यास ज्यांची संधी हिरावली गेली, ते समोर अनेक संकटे उभी करतात.



जीवन चक्र

आम्ही आतापावेतो मागील युगात होऊन गेलेल्या संत महापुरूषांच्या जीवनाकडे एक दृष्टीक्षेप टाकला तर त्या सर्वांमध्ये आम्हांला एक गुण दिसून येतो जो त्यांच्या यशस्वी होण्याकरीता आवश्यक होता. असे नव्हते की ते अलौकीक क्षमता घेऊन जन्माला आले होते. असेही नव्हते की, ते मानवापेक्षा काही अधिक होते. आध्यात्मिक ध्येयाप्रती संपूर्ण समर्पण या त्यांच्या गुणांमुळे ते इतरांपेक्षा वेगळे होते. त्यांनी आपले संपूर्ण लक्ष्य आपल्या ध्येयावरच टिकवून ठेवले आणि ते संपूर्ण यशस्वी होत नाहीत तो पर्यंत ते थांबले नाहीत. आम्ही आमच्या जीवनात कोणतेही यश इच्छित असू तर ते यशस्वी करण्याचे एक गुपित आहे की, उन असो वा पाऊस, समुद्रात वादळ असो किंवा तो शांत असो आम्ही आमच्या ध्येयावर आपले लक्ष्य केंद्रित केले पाहिजे. मग ते ध्येय आध्यात्मिक असो किंवा संसारीक असो आपल्या ध्येयाप्रत टिकून राहणे हे सत्य आहे. ह्या जगातील जसे खेळ, विज्ञान किंवा कला ह्या क्षेत्रात जे निपुण, यशस्वी झालेत त्यांनी आपल्या ध्येयाप्रती असणाऱ्या समर्पण भावनेमुळेच आश्चर्यकारक यश मिळविले. ह्या संदर्भात भारताचे महान लेखक, कवी, चिंतक, रविंद्रनाथ टागोर ह्यांच्या जीवनातील एक घटना आहे. त्यांनी शांतीनिकेतन, आश्रमाची स्थापना केली आणि तेथे ते दररोज फार मेहनत करत होते. सन १९३९ मध्ये महात्मा गांधी तेथे आले त्यांनी तेथे सार्वजनिक भाषण केले. भाषणानंतर त्यांनी रविंद्रनाथ टागोरांबरोबर एकमेकांच्या आवडीच्या विषयांवर संवाद साधला.

दुपारच्या जेवणानंतर गांधीजी जेव्हा आराम करण्याकरीता गेले तेव्हा आश्रमातील काही कार्यकर्ते जे रविंद्रनाथांचे भक्त होते गांधीजींकडे आले आणि म्हणाले की, 'गांधीजी, आपण आमची मदत करू शकाल का? आपणास काय पाहिजे? गांधीजींनी विचारले, आम्ही रविंद्रनाथ टागोरांच्या तब्येतीमुळे काळजीत आहोत. त्यांची तब्येत ठीक नाही. डॉक्टरांनी त्यांना आराम करण्याचा सल्ला दिला आहे. परंतु ते हे मान्य करत नाही. दुपारच्या जेवणानंतर ते लगेचच कामाला लागतात आणि क्षणभरही आराम करत नाहीत. त्यांची तब्येत बिघडू नये असे आम्हांला वाटते. गांधीजी म्हणाले, आपणास असे का वाटते की मी त्यांना काही सांगावे. कार्यकर्ते म्हणाले, आम्हांला माहित आहे की ते आपल्या सल्याच्या विरोधात जाणार नाहीत हे ऐकून गांधीजी रविंद्रनाथ टागोरांना हे सांगण्यास तयार झालेत की, त्यांनी थोडा वेळ आराम करावा. विश्रांती घ्यावी.

(कृपाल आश्रम, अहमदनगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र

जमीन सूख रही थी, पानी सिंचित करने की हमारी पूरी तैयारी थी लेकिन दीदी से चर्चा की तब उन्होंने निश्चय से कहा, आज बारिश होगी यह संकल्प करो और प्यारे बाबा को याद करो। सचमुच रात में जोरदार बारिश हुई और हमें १५ दिन राहत मिल गई। फसल पकने तक दो बार और पानी सिंचित करना पड़ा तब जाकर अच्छी फसल तैयार हुई। यह भी प्यारे बाबा का ही शुक्रिया कहेंगे।

दूसरा अनुभव, रबी की फसल काटने के पश्चात जो वेस्ट पदार्थ (भूसा) बचता है उसे खेतों में ही जिस जगह जला दिया गया था वहाँ की फसल अच्छी रीति वृद्धि नहीं हो रही थी जिससे थोड़ा परेशान था। उस समय भगवान के यह महावाक्य याद आये कि बच्चे, दिल से भगवान को याद करो तो मुराद हांसिल होगी। सचमुच एक हफ्ते में ही फसल बहुत अच्छी तैयार होके लहराने लगी।

इस वर्ष अन्य किसानों ने अत्याधिक रासायनिक कीटनाशकों का प्रयोग किया, फिर भी कीट खूब लगे थे और फसल उतनी अच्छी नहीं रही। मैंने अपनी खेती में कीटनाशक के रूप में गोमूत्र, नीम का तेल और करंज का तेल छिड़काव किया तो मेरी फसल बहुत अच्छी रही। अब तो मुझे पक्का निश्चय हो गया कि पेड़–पौधों को जितना हम प्यार और शुभ संकल्प देंगे, प्रकृति भी हमें रिटर्न में बहुत कुछ देगी। जमीन और पौधों को विष (जहर) की नहीं, थळीह यानी शुभ भावना की आवश्यकता है तभी किसान कम लागत में अधिक प्राप्ति करने से खुशहाल हो सकता है। हमारे घर की बाड़ी में एक अमरूद का पेड़ है, जिसमें हर साल फल लगते हैं पर बहुत ही छोटे और वो भी गिर जाते हैं। इस बार अमरूद के पेड़ के पास प्रतिदिन जाकर प्यारे बाबा की याद में यह शुभ व श्रेष्ठ संकल्प करने लगा कि तुम इस बारी अच्छी तरह से बढ़ना... । मैंने पूरी निष्ठा के साथ उस पेड़ के नीचे खाद डालते हुए विजुवलाइजेशन किया कि फल बड़े हुए हैं... और हम सब खुशी से खा रहे हैं...। सचमुच ७ दिनों में ही आश्चर्यजनक परिणाम देखने को मिले। अमरूद बहुत बड़े–बड़े हो गये। मैं सबसे पहले प्यारे बाबा का शुक्रिया अदा किया क्योंकि ऐसी कमाल तो वही कर सकते हैं इससे और विश्वास बढ़ गया कि शुभ संकल्पों की शक्ति से खेती में भी नवीनता की जा सकती है।

इसी प्रकार एक और प्यारा–सा अनुभव मेरे पास है कि जब हमने कद्दू (कुम्हड़ा) के बीज बोये थे तो उसकी बेल तो बड़ी अच्छी लंबी बढ़ रही थी, उसमें फूल भी लग रहे थे पर वो फूल झड़ जाते थे इस कारण उसमें कोई फल नहीं लग रहे थे। हम सोचने लगे कि इसमें फल क्यों नहीं लग रहे हैं। फिर मुझे किसी अनुभवी से जानकारी मिली कि ये कद्दू नहीं फलेंगे क्योंकि इनमें परागण नहीं हो पाये हैं। जैसे ही ये बातें सुनी, उसे एक चुनौती के रूप में स्वीकार किया और निश्चय किया कि जब धान की फसल को यौगिक पद्धति से तैयार कर सकते हैं तो ये क्यों नहीं कर सकते? उन पौधों के पास बैठ करके मैं बाबा की याद में शुभ संकल्प करने लगा और यह विजुवलाइजेशन (मनोचित्र) किया कि कद्दू के फल बढ़ रहे हैं...। फिर उन पौधों को यह स्वमान दिलाया कि आप अच्छे पौधे हो...। खूब फल रहे हैं..., आप हमें भी आनंद प्रदान कर रहे हैं...। तो देखा कि १०–१५ दिन में ५–६ अच्छे और बड़े फल लगे, यह देखकर बहुत ही खुशी हुई। ऐसे छोटे–छोटे योग के प्रयोग बहुत अनुभव किये। मैंने देखा कि परमात्म स्मृति में रहकर के कोई भी कर्म करो तो उसमें परमात्मा की शक्ति भर जाने से सफलता अवश्य मिलती है।

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

''मन्या, तुझ्या घड्याळात वाजले किती?''
बंडूने विचारले, ''पाच वाजले''
मन्या म्हणाला, ''माझ्या घड्याळात सव्वापाच वाजले आहेत.''
''नाही. माझं घड्याळ रेडियो टाईम आहे.''
''माझंही रेडियो टाईम आहे?''
''तुझ्याकडे कोणता रोडियो आहे?''
''फिलिप्स!''
''मग बरोबर. माझ्याकडे 'बुश' आहे.''

रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)

आता शांत बसण्याची वेळ आली आहे
जीवनाविषयीची कृतज्ञता व त्याचे गाणे
या उतू जाणाऱ्या शांत निवांत क्षणी
गाण्याची वेळ आली आहे



मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर
मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,
भिंगार मो. ९४०३७३४२८१

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रीला दुय्यम स्थान दिले जाते. भारतीय संस्कृतीने स्त्रीची प्रतिमा सोशीक, दुसऱ्याची काळजी घेणारी, स्वतःचे मत न मांडणारी आणि प्रेमळ अशी बनवलेली आहे. त्यामुळे खरोखरच पुरुषांपेक्षा स्त्रिया दुपटीने नैराश्येने ग्रासतात. त्यातून बाहेर पडण्यासाठी वेळीच मानसोपचार तज्ज्ञांचे मार्गदर्शन व उपचार घेण्याची गरज असते. त्यामुळे जीवन संपवण्याचे प्रमाण कमी होईल. घरातील इतर सदस्यांनी नैराश्यावस्थेतील स्त्रीची लक्षणे ओळखून तिला त्यातून बाहेर काढण्यासाठी समुपदेशन व उपचार करून घ्यावेत. परंतु अनेक जण मानसोपचार तज्ज्ञांकडे जाणे, म्हणजे त्या स्त्रीला वेड लागले आहे, असे समजतात. त्यामुळे बऱ्याचशा स्त्रिया डॉक्टरांकडे जाण्याचे टाळतात. त्या स्त्रीने उपचार घेण्यास सुरुवात केली, तरी इतर सदस्यांचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. परंतु असे वागणे अतिशय चुकीचे आहे. नैराश्यावस्था प्रत्येकाच्याच आयुष्यात येत असते. काहींना त्यावर मात करता येत नाही. म्हणून मानसोपचार तज्ज्ञांची गरज लागते.

अशा गैरसमजुतींमुळे वेळीच नैराश्यावस्थेत उपचार न मिळाल्याने अनेक जणींनी जीवनयात्रा संपवली आहे, हे कटू सत्य आहे. मानसोपचार तज्ज्ञ या अवस्थेतून बाहेर काढण्यास मदत करतात. काही वेळेला नैराश्यावस्थेतील स्त्री डॉक्टरांकडे जाण्यास तयार होत नाही. तिला त्रास जाणवत असतो. परंतु उपचार घेण्याची गरज वाटत नाही. अशा वेळी जवळच्या व्यक्तींनी तिला समजावून उपचार घेण्यास तयार करावे.

सहसा हा त्रास मासिक पाळी सुरू झाल्यानंतर म्हणजेच साधारणतः ११ ते १४ वर्षे वयोगटातील कुमारीमध्ये तसेच रजोनिवृत्तीच्या वयातील म्हणजेच साधारणतः चाळिशीमध्ये नैराश्याचा त्रास जाणवतो. मासिक पाळी सुरू होताना हार्मोन्समध्ये बदल होतात. त्यामुळे मुलींच्या मनावर दडपण येते.

(क्रमशः)

– डॉ. शारदा निर्मळ–महांड्ळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं– ८७९३४००४००

सिंधी समाजाच्या ‘चालिहो’ उत्सवास प्रारंभ

सिंधी कॉलनी, तारकपुर येथील श्री झुलेलाल मंदिर येथील चालिहो व्रत आरंभनिमित्त आयोजित कार्यक्रमात पुज्य बहराणोसाहिबची पूजा करण्यात आली. (छाया – जयकुमार रंगालानी)

नगर – सिंधी बांधवांच्या चाळीस दिवसांच्या उपवासाचे पर्व (१६ जुलै ते २४ ऑगस्ट) अर्थात ‘चालिहो साहिब’ची कालपासून मोठ्या उत्साहात, श्रद्धाभावाने सुरुवात झाली. सिंधी कॉलनी, तारकपुर येथील श्री झुलेलाल देव मंदिर येथील चालिहो व्रत आरंभनिमित्त आयोजित कार्यक्रमात बहराणोसाहिबची पूजा सिंधी जनरल पंचायतचे अध्यक्ष महेश मध्यान यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर आरती अखो पल्लव तसेच भजने म्हणत उत्सवाचा प्रारंभ करण्यात आला व भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आले.

यावेळी जनरल पंचायत कमिटीचे सुरेश हिरानंदानी, प्रदीप आहुजा, जयकुमार रंगलानी, रमेश तनवानी, सुनिल बजाज, विनोद कुकरेजा, रमेश कुकरेजा, भरत नवलानी, प्रेम बजाज, द्वारका किंगर, किशन पंजवानी, जयकुमार खुबचंदानी, लिलाराम खुबचंदानी, राजू बजाज, डॉ.टेकवाणी, कपिल किंगर, हरिश हरवानी, कुमार गाबरा आदींसह जनरल पंचायत सल्लागार समिती सदस्य, उत्सव समिती सदस्य व झुलेलाल मंदिर समिती सदस्य उपस्थित होते. आरती प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आ.संग्राम जगताप, माजी नगरसेवक योगिराज गाडे, अजिंक्य बोरकर आदी उपस्थित होते.

या शिवाय सावेडी येथील सत्नाम साक्षी गो–शाळेत तसेच गुलमोहोर रोडवरील माता लालवारी झुलेलाल मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांनी ‘चालिहो’ उत्सवास प्रारंभ करण्यात आला.

चालिहो विषयी अधिक माहिती देतांना सिंधी जनरल पंचायत समितीचे प्रसिद्धी प्रमुख किशोर खुबचंदानी म्हणाले की, ‘चालिहो’ नावाच्या या धार्मिक सणोत्सवाला सिंधी समाजात आगळे–वेगळे असे महत्व आहे. चालिहो सणाचा संबंध जलदेवतेशी आहे. सिंधी समाजात वरुण देवतेची पूजा प्राचिन काळापासून केली जाते.

चालिहो हा वरुणदेवता झुलेलाल यांच्या पुजेशी संबंधित असून, भगवान झुलेलाल हे सिंधी समाजाचे इष्टदेव आहेत. चालिहो याचा अर्थ चाळीस दिवांसांचे व्रत, उपवास, पूजा इत्यादी. झुलेलालचे भक्त चाळीस दिवसांचा उपवास करतात. या काळात काही नियम पाळीत, वरुण देवतेची पूजा व स्तुती करण्यात येते. मंदिरात जाऊन सामुहिक प्रार्थनेद्वारे समस्त मानवजातीच्या कल्याणाची भावना व्यक्त केली जाते, असे शेवटी सांगितले.

सिंधी कॉलनी येथील श्री झुलेलाल मंदिरात पुढील चाळीस दिवस दररोज सायंकाळी बहराणोची पूजा, आरती, पल्लव नंतर हथप्रसादाचे आयोजन करण्यात येत असून, रात्री ८ ते १० या वेळेत गायक बल्लू सचदेव यांचे भक्तीगीते, झुलेलाल चालिसाचा कार्यक्रम होईल. तरी भाविकांनी सर्व कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन श्री झुलेलाल मंदिर समिती व सिंधी जनरल पंचायतच्यावतीने करण्यात आले आहे.

मोहरमनिमित्त रामवाडी येथे जलाल शहा मित्र मंडळाच्या वतीने आयोजित भंडाराप्रसंगी उपस्थित आ.संग्राम जगताप व मंडळाचे पदाधिकारी.

मोहरमनिमित्त रामवाडी येथे भंडाऱ्याचे आयोजन

नगर – मोहरमच्या नववी निमित्त रामवाडी येथे जलाल शहा मित्र मंडळाच्या वतीने सालाबाद प्रमाणे यावर्षी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

हिंदू मुस्लिम एक्याचे पतीक असलेल्या रामवाडी भागातील जलाल शहा मित्र मंडळाच्या वतीने नगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते भंडाऱ्याचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी हसन व हुसेन यांच्या सवारी ला पाहण्यासाठी आलेल्या जिलल्हा व महाराष्ट्रातील भाविकांनी या भंडाऱ्याचा लाभ घेतला. जलाल शहा मित्र मंडळ दरवर्षी या भंडाऱ्याचे आयोजन करत असते. यावेळी बोलताना आ. संग्राम जगताप म्हणाले की रामवाडी मधील जलाल शहा मित्र मंडळ हे नेहमीच समाज उपयोगी कार्य करत असतात. तसेच कार्य त्यांच्या हातून भविष्यातही होत राहावे असे जलाल शहा मित्र मंडळाला आमदारांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी साहेबान जागीरदार, बाली बांगरे, जावेद शेख, फिरोज शेख, अमजद शेख, सलमान सय्यद, असीम शेख आदिसह जलाल शहा मित्र मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता बँक झिरो बॅलन्समध्ये बचत खाते उघडून देणार

नगर – अलिकडेच महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमार्फत रु. १५०० बँकेच्या बचत खात्यामध्ये जमा करण्याची योजना सुरु केलेली आहे. त्यासाठी कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेमध्ये यापूर्वी महिलांनी बचत खाती उघडली आहेत. अशा सर्व महिलांच्या खात्यांमध्ये रु. १५०० चा लाभ मिळणार आहे.

तथापि, ज्या महिलांनी अद्याप बँकेमध्ये बचत खाते उघडले नाही, अशा सर्व महिलांसाठी झिरो बॅलन्सवर बँकेमार्फत बचत खाती उघडून घेतली जाणार असल्याची माहिती बँकेचे चेअरमन स्वप्निल आवाडे यांनी दिली.

महिलांनी बँकेमध्ये झिरो बॅलन्सवर बचत खाते उघडल्यास, बचत खात्यामध्ये महाराष्ट्र शासनामार्फत दिले जाणारे रु. १५०० बँकेच्या बचत खात्यामध्ये आपोआप जमा होणार आहेत. तरी सर्व माता–भगिनींनी या योजनेचा लाभ घेवून, आपले बचत खाते कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेमध्ये उघडण्याचे आवाहन केले व शासन देत असलेल्या योजनेचा लाभ घेण्याची विनंती करण्यात येत आहे.

इतकेच नव्हे तर, बँकेचा स्वतःचा QR Code उपलब्ध असून, ज्या त्या दिवशी पैसे बँकेच्या खात्यामध्ये जमा होणार असल्यामुळे, व्यावसायिक दृष्टीकोनातून याचा फायदा सर्वांना होणार आहे. अनेक व्यापार व उद्योगक्षेत्रातील व्यक्तींनी या योजनेचा लाभ घ्यावा व बँक देत असलेल्या QR Code चा अवलंब करावा, असे चेअरमन स्वप्निल आवाडे म्हणाले.

अलिकडेच कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेचे नाव सिटी अँड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कार्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, मुंबई (CIDCO) या संस्थेच्या यादीमध्ये बँकेचे नाव समाविष्ट झाल्यामुळे, नवी मुंबई परिसरात अपार्टमेंट किंवा प्लॉटधारकांसाठी गृह कर्जपुरवठा करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यास बँक नेहमीच कटिबध्द राहणार आहे. या व यासारख्या अनेक सुविधांचा लाभ देण्यासाठी बँक नेहमीच अग्रेसर व कटिबद्ध आहे. सुविधांचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन बँकेचे चेअरमन स्वप्निल आवाडे केले आहे.

तपोवनरोडवरील ज्ञानसंपदा शाळेत दिंडी उत्सव उत्साहात साजरा झाला यावेळी विद्यार्थ्यांच्या आजी आजोबाच्या हस्ते आरती करण्यात आली. (छाया – उदय जोशी)

तपोवनरोडवरील ज्ञानसंपदा शाळेत दिंडी उत्सव उत्साहात

नगर – भारतीय संस्कृतीची जोपासना होण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये वारकरी संप्रदायाची रुजवणूक व्हावी, विद्यार्थ्यांना आपल्या रीतीरीवाजांचे पालन करता यावे व त्यांच्यामध्ये सद्गुण वृद्धिंगत व्हावे, वारकरी संप्रदायातील संतांची शिकवण त्यांना आचरणात आणता यावी या उद्देशाने तपोवन रोड सावेडीतील ज्ञानसंपदा शाळेतील विद्यार्थ्यांनी दिंडी उत्सवाचा मनमुराद आनंद लुटला. या दिंडी उत्सवामध्ये एलकेजी ते इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी पारंपारिक वारकऱ्यांच्या वेशभूषेत पालखी मिरवणुकीत सहभाग घेतला. हातामध्ये भगवी पताका, कपाळी केशरी गंध, डोक्यावर तुळस असा वारकऱ्यांच्या वेशभूषेत बाळ गोपाळांचा संत मेळा विठू नामाचा गजर करत होते.

सुरुवातीला शाळेच्या प्रांगणात आरती करून विद्यार्थ्यांनी व आजी–आजोबांनी अतिशय भक्ती भावाने अभंगाचे सादरीकरण केले. त्यानंतर विद्यार्थी, शिक्षक व आजी आजोबा यांनी पालखीची मिरवणूक काढली. शाळेचा संपूर्ण परिसर हा राम कृष्ण हरी तसेच ज्ञानोबा माऊली तुकाराम या जयघोषाने दुमदुमून गेला. याप्रसंगी श्लोक अभंग स्पर्धेच्या विजेत्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. या दिंडी उत्सवात विद्यार्थ्यांबरोबर आजी–आजोबांचा असा प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. मुख्याध्यापिका सौ. शिवांजली अकोलकर, सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी पालक उपस्थित होते.

चांगले फुटबॉल खेळाडू घडविण्यासाठी चांगले प्रशिक्षक देखील निर्माण होण्याची गरज

नरेंद्र फिरोदिया यांचे प्रतिपादन; अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या डी परवाना शिबिराचे उद्घाटन

अहमदनगर जिल्हा फूटबॉल असोसिएशनच्यावतीने फूटबॉल प्रशिक्षण शिबिरात सहभागी झालेले खेळाडू.

नगर – फुटबॉल प्रशिक्षक होण्यासाठी या शिबिराच्या माध्यमातून खेळाडूंना एक चांगली संधी मिळाली आहे. चांगले फुटबॉल खेळाडू घडविण्यासाठी चांगले प्रशिक्षक देखील निर्माण होण्याची गरज आहे. फुटबॉल प्रशिक्षक या खेळाचा कणा आहे. फुटबॉल खेळाचा विकास व्हावा, या एकच भावनेने अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन कार्य करत आहे. या शिबिराच्या माध्यमातून खेळाडूंना घडविण्यासाठी उत्तमप्रकारे प्रशिक्षकांना मार्गदर्शन केले जाणार असल्याचे नरेंद्र फिरोदिया यांनी सांगितले.

अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या वतीने अधिकृत फुटबॉल प्रशिक्षक होण्यासाठी शहरात आयोजित केलेल्या डी परवाना शिबिराचे उद्घाटन असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते झाले. फुटबॉल प्रशिक्षक घडविण्यासाठी पहिल्यांदाच ऑल इंडिया व वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनच्या मान्यतेने पाच दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या उद्घाटन सोहळ्यासाठी असोसिएशनचे खजिनदार राणा परमार, सचिव रॉनप फर्नांडिस, सहसचिव प्रदिपकुमार जाधव, विक्टर जोसेफ, अहमदनगर महाविद्यालयाचे फिजीकल डायरेक्टर सॅविओ वेगास, उपप्राचार्य डॉ. नोएल पारघे, शहर बँकेचे संचालक प्रा. माणिक विधाते, ऑल इंडिया फुटबॉल असोसिएशनचे एज्युकेटर कोच सलिम पठाण, उपाध्यक्ष खालिद सय्यद, सहखजिनदार रणबीरसिंह परमार, कार्यकारिणी सदस्य पल्लवी सैंदाणे, राजू पाटोळे, जेव्हिअर स्वामी, रमेश परदेशी, जोनाथन जॉय आदींसह प्रशिक्षणार्थी खेळाडू उपस्थित होते.

एज्युकेटर कोच सलिम पठाण म्हणाले की, खेळाडूंनी आपले पॅशन करिअरमध्ये उतरवावे, यामुळे जीवनाचा खरा आनंद लुटता येणार आहे. फुटबॉल हा सर्वोत्तम खेळ असून, युवक–युवतींसाठी एक चांगले करिअर म्हणून या खेळाकडे पाहण्याची गरज आहे. खेळाडूंनी व प्रशिक्षकांनी या खेळाचे तंत्रशुध्द माहिती व ज्ञान आत्मसात करण्याचे त्यांनी आवाहन केले.

अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर २१ जुलैपर्यंत प्रशिक्षण चालणार असून, डी परवाना शिबिराला युवकांसह युवतींचा देखील प्रतिसाद मिळाला आहे. शिबिरासाठी असोसिएशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर व अहमदनगर महाविद्यालयाचे मोलाचे सहकार्य मिळाले आहे. यामध्ये ऑल इंडिया फुटबॉल असोसिएशनचे एज्युकेटर कोच सलिम पठाण शिबिरार्थी प्रशिक्षकांना खेळातील नियम, अटी, खेळातील बारकावे, गुण पध्दती, खेळाडूंमध्ये कौशल्य निर्माण करणे आदी फुटबॉल खेळाशी संबंधीत मार्गदर्शन करणार आहे. प्रास्ताविक रॉनप फर्नांडिस यांनी केले. प्रदिपकुमार जाधव यांनी सूत्रसंचालन करुन आभार मानले.

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर शाखेच्या वर्धापनदिन कार्यक्रमात प्रमुख अतिथी पद्मश्री निलीमा मिश्रा यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. बापूसाहेब कांडेकर,, दिपक गुजराथी आदी. दुसऱ्या छायाचित्रात प्रसन्न खाजगीवाले, माधव देशमुख डॉ. गिरीश कुलकर्णी, प्रशांत अहिर, डॉ. बापूसाहेब कांडेकर आदी.

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर शाखेचा ७७ वा प्रतिष्ठापना कार्यक्रम

नगर – रोटरी क्लबच्या अहमदनगर शाखेचा ७७ वा प्रतिष्ठापना सोहळा (इन्स्टॉलेशन सेरेमनी) पाईपलाईन रोड, सावेडी येथील मेरीलँड सभागृहात झाला. या मनोहारी व सुबकशा कार्यक्रमामध्ये वर्ष २०२४–२५ साठी नवनियुक्त अध्यक्ष रो. नितिन थाडे व सचिव रो. सुभाष गर्जे यांनी मावळते अध्यक्ष रो. माधव देशमुख व सचिव रो. दिपक गुजराथी यांच्या कडून विधिवत पदक व कार्याची सूत्रे स्वीकारली.

या वेळेस व्यासपीठावर कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी, रॅमन मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित पद्मश्री निलीमा मिश्रा यांच्यासह व्यासपीठावरील अतिथींमध्ये डॉ. गिरीश कुलकर्णी (संचालक स्नेहालय), डॉ. बापुसाहेब कांडेकर (प्रसिध्द हृदयरोग तज्ञ व संचालक नोबल हॉस्पिटल अहमदनगर) व प्रशांत अहीर, (माजी उपाध्यक्ष रिलायन्स उद्योगसमूह व मनुष्यबळ विकास तज्ज्ञ) यांची उपस्थिती होती.

समारोपाच्या अध्यक्षीय भाषणामध्ये रो. माधव देशमुख यांनी नवीन पदाधिकाऱ्यांचे स्वागत करतांना गतवर्षीच्या भरगच्च उपक्रमांचा धावता आढावा घेतला, रो. दिपक गुजराथी यांनी रोटरी क्लबला सहकार्य केलेल्या व्यक्तिंचा व विशेष्त्वे रो. डॉ. प्रकाश कांकरिया दांपत्यांचा उल्लेख केला.

रो. नितिन थाडे यांनी अध्यक्षपदाची सुत्रे हाती घेतांना आपल्या भाषणात रोटरी डिस्ट्रिक्ट प्रांतपाल डॉ. सुरेश साबु यांनी दिलेल्या नई दिशाये, नई आशाये नया विश्वास या शिर्षकांतर्गत समाविष्ट असलेल्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली.

त्यामध्ये प्रामुख्याने कर्करोग जागृकता व निदान, हॅपी स्कुल, रोटरी स्किल डेव्हलपमेंट सेंटर, पर्यावरण संकल्प, रस्ता सुरक्षा कार्यक्रम, स्वयंरोजगार, आरोग्य, शिक्षण, चित्रपट महोत्सव, आदी अनेक क्षेत्रांमधील प्रस्तावित उपक्रमांची माहीता दिली.

डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी अहमदनगर ते बांगलादेश सद्भावना सायकल रॅली मध्ये रो. नितिन थाडे, रो. माधव देशमुख व रोटरी क्लबच्या सदस्यांनी केलेल्या सहकार्याच्या आठवणींना उजाळा दिला. रो. डॉ. बापुसाहेब कांडेकर यांनी सामाजिक वनीकरणासारख्या व्यापक व विषय केंद्रीत कार्यक्रमाची निकड असल्याचे व त्याकरिता रोटरीसारख्या संस्थेने पुढाकार घेण्याची आवश्यकता असल्याचे विशद केले.

ॲड. महेरनाथ कल्चुरी, (विश्वस्त अवतार मेहेरबाबा चॅरीटेबल ट्रस्ट) यांनी अवतार मेहेरबाबा ट्रस्ट द्वारा अंतर्भुत असलेल्या सामाजिक कार्याचा उल्लेख करतांना रोटरी क्लबसोबत सहयोगाची अपेक्षा केली.प्रशांत अहीर यांनी मेहेरबाबांच्या निरपेक्ष प्रेम आणि निष्काम सेवा या शिकवणींना आपल्या भाषणातून अधोरेखित केले.

आपल्या अध्यक्षीय मनोगतामधून पद्मश्री श्रीमती निलीमा मिश्रा यांनी रोटरी इंटरनॅशनलच्या कार्याचा आवर्जुन उल्लेख करतांना जिल्ह्यामधील महिला बचत गटाच्या कौशल्यविषयक, उपजिविका विषयक कार्यक्रम अधिक गतिमान करण्याच्या दृष्टीने रोटरी क्लब सारख्या संस्थेसोबत कार्य करण्याचा मनोदय व्यक्त केला.

कार्यक्रमास माजी कुलगुरु रो. डॉ. सर्जेराव निमसे, रो. जवाहर मुथा, रोटरी सहायक प्रांतपाल रो. प्रसन्न खाजगीवाले व रो. पुरुषोत्तम जाधव, रो. दादासाहेब करंजुले, रो. निलेश वैकर, रो. महावीर मेहेर, रो. कौशिक कोठारी, रो. प्रशांत बोगावत, रो. हर्षवर्धन सोनवणे, रो. डॉ, गुलशन गुप्ता, रो. इश्वर बोरा, रो. अजय पिसुटे, रो. सुहास क्षिरसागर, रो. रविंद्र राऊत, रो. महेश गोपालकृष्णन, रो. राजीव गुप्ता, रो. शुभा बोगावत, इतिहासकार भुषण देशमुख, उद्योजक दिपक चांदोरकर यांच्यासह शहरातील अनेक मान्यवर नागरीक व रोटरी क्लबशी संबंधित अनेक आजी–माजी पदाधिकारी व सहकारी उपस्थित होते. रो. सुभाष गर्जे यांनी आभार प्रदर्शन तसेच मेहेरबाबा केंद्राच्या सौ. सुरेखा डाडर यांनी सूत्रसंचालन केले.

केडगाव येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन

नगर – एच.व्ही देसाई हॉस्पिटल, पुणे व केडगाव येथील हरीहरेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण व जिव्हाळा ज्येष्ठ नागरिक, अपंग, अनाथ, निराधार, मंचाच्यावतीने प्रतिष्ठाणचे अध्यक्ष डॉ. चेमटे श्रीकांत यांनी १९ जुलै रोजी सकाळी ८ ते २ वाजेपर्यंत मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन स्वामी विवेकानंद चौक, भुषणनगर, केडगाव देवी, नगर येथे केले आहे. या शिबीरामध्ये एच. व्ही. देसाई हॉस्पिटल पुणे येथील तज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करुन डोळ्यांच्या समस्यावर योग्य मार्गदर्शन व औषधोपचार केले जाणार आहेत. तसेच चष्म्याचा अचुक नंबर काढून दिला जाईल व रुग्णांची रक्तातील साखर व रक्तदाब तपासणी करुन मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड केली जाणार आहे.

मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड केलेल्या रुग्णांना शिबीराच्या ठिकाणापासून, मोफत प्रवास, राहण्याची, जेवण्याची तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रियेनंतर काळा गॉगल मोफत, तसेच बिनटाक्याची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करुन चांगल्या प्रतीचे लेन्स वापरले जाणार आहेत. नागरिकांनी व नेत्र रुग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा. नाव नोंदणीसाठी मोबा. नं. ९३२५१०८०५७, ८४२१२८६७०९ या नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. चेमटे श्रीकांत यांनी केले आहे.

आषाढी एकादशीनिमित्त तारकपूर येथे गुरुनानक देवजी ग्रुपच्यावतीने खिचडीचे वाटप करण्यात आले.

आषाढी एकादशीनिमित्त तारकपूरला भाविकांना खिचडी वाटप

नगर – शहरातील तारकपूर येथे गुरुनानक देवजी सेवा ग्रुप (जी.एन.डी.) च्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त भाविकांना खिचडीचे प्रसाद वाटप करण्यात आला. जनक आहुजा यांच्या हस्ते प्रसाद वाटपाला प्रारंभ करण्यात आले. यावेळी संजय आहुजा, जीतू गंभीर, जय रंगलानी, महेश मध्यान, विकी कंत्रोड, अवतार गुर्ली, बबलू खोसला, बाबा कर्नलसिंग, करन आहुजा आदी उपस्थित होते.

जनक आहुजा म्हणाले की, गुरुनानक देवजी सेवा ग्रुपच्या माध्यमातून विविध सण–उत्सवात प्रसादचे वाटप करण्यात येते. धार्मिक कार्यक्रमाबरोबर रक्तदान, आरोग्य शिबिर, वृक्षरोपण आदी विविध सामाजिक उपक्रम देखील राबविण्यात येत असल्याची त्यांनी माहिती दिली. जय हरी विठ्ठलच्या गजरात भाविकांनी खिचडीचा आस्वाद घेतला.

सारसनगर येथील श्री रामदेवरा दरबार याच्या श्री रामदेव भक्त मंडल (ट्रस्ट) यांच्या वतीने पंढरपूरला पायी वारीने जाऊन दर्शन करून परतणाऱ्या भक्तांना, वारकऱ्यांना महाप्रसादाचे करण्यात आले. सुमारे २५०० वारकरी व भक्तांनी याचा लाभ घेतला (छाया – अनिल शाह)

श्री रामदेव भक्त मंडलातर्फे वारकऱ्यांना महाप्रसाद वाटप

नगर – नगरच्या सारसनगर येथील श्री रामदेवरा दरबार याच्या श्री रामदेव भक्त मंडल (ट्रस्ट) यांच्या वतीने पंढरपूरला आषाढी एकादशीच्या निमित्ताने श्री विठ्ठल–रखुमाईचे पायी वारीने जाऊन दर्शन करून परतणाऱ्या भक्ताना, वारकऱ्यांना दरवर्षी महाप्रसादाचे वाटप केले जाते बुधवारी सायंकाळी माळीवाडा बसस्थानकामधे या ट्रस्टचे पदाधिकारी, सभासद, कार्यकर्ते यांनी मिळून या प्रसादाचे वाटप केले. सुमारे २५०० भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.

या महाप्रसादाच्या वाटपाचे व अश्या स्तुत्य उपक्रमाचे मंडळाचे यंदाचे सहावे वर्ष होते. या व्यतिरिक्त हे मंडळ वर्षभर अनेक सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक उपक्रम राबवित असते. उदा. रक्तदान शिबीर, श्री राम जन्म उत्सव, हनुमान जयंती, नवरात्रोत्सव, भाद्रपद महिन्यात श्री रामदेव बाबा मंदिरात बाबांच्या प्रगट दिनानिमित्तविशेष धार्मिक सप्ताहाचे आयोजन हे मंडळ करीत असते.

सारसनगर येथे श्री रामदेवरा भव्य अश्या दरबाराची (मंदिर)निर्मिती मंडळाच्या वतीने करण्यात आलेली असून सध्या तेथील जागेत भक्त निवास, सत्संग हॉल, व भोजन गृहाची निर्मितीचे काम सुरु असून यासाठी अनेक दानशूर व्यक्तींचे सहकार्य मिळत असल्याची माहिती श्री रामदेव भक्त मंडळ ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

वृक्षारोपण ही काळाची गरज आहे

शाम नळकांडे यांचे प्रतिपादन; आषाढी एकादशीनिमित्त गणेशनगर मध्ये विविध धार्मिक कार्यक्रमाने साजरी

कल्याण रोड येथील गणेशनगरमध्ये आषाढी एकादशीनिमित्त वृक्षारोपण करण्यात आले.

नगर – कोरोना काळात ऑक्सिजनचे महत्त्व मानवाला समजले आहे. पृथ्वीवरील झाडे कमी झाल्याने ऑक्सिजनचे प्रमाण ही कमी झाले आहे. प्रत्येकाने एक तरी झाड लावावे. गणेशनगर येथील नागरिकांनी आषाढी एकादशी निमित्त वृक्षारोपण करून त्याचे पालकत्व स्वीकारले आहे. ही कौतुकास्पद बाब आहे. वृक्षारोपण ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन माजी नगरसेवक शाम नळकांडे यांनी केले आहे.

कल्याण रोड येथील गणेशनगर मध्ये आषाढी एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. दुपारी महिलांनी व बालकांनी वृक्षदिंडी काढली. तसेच परिसरातील ओपनस्पेस मध्ये ठिकठिकाणी वृक्षारोपणही करण्यात आले.

यानंतर संध्याकाळी श्री विठ्ठलाच्या भक्ती संगीताचा कार्यक्रमात सुधाकर देवतरसे, संजय कुलकर्णी, नामदेव भोर, दशरथ कराळे, अरवडे मेजर, वाकचौरे सर, चेमटे गुरुजी, प्रदिप जावळे, अ‍ॅड.सुरेश लगड आदींनी भजने गायीली.

याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत माजी नगरसेविका पुष्पाताई बोरुडे, माजी नगरसेवक शाम नळकांडे, गणेशनगरचे चेअरमन गणेश शिंदे, नाना देवतरसे, पोपट रासकर, पोपट शेळके, राजू तेल्ला, उमेश गोरे, संजय वाघस्कर, अनिल राऊत, संतोष लयचेट्टी, गणेश मंचिकटला, राजु वाळके, अमोल भांबरकर, सौ.ताराबाई शिंदे, जयश्री देवतरसे, ज्योती रासकर, रोहिणी तेल्ला, प्रतिक्षा भापकर, मंदाकिनी चोथे, मयुरी गोरे, सुवर्णा कोकणे, विजया भांबरकर, जयश्री ढेरे, भारती चिलका, अर्चना वाळके, मनिषा भांबरकर, मयुरी भांबरकर, रुपाली मंचिकटला, आरती सिसोदिया, वंदना वाघमारे, रोहिणी रसाळ, ताकपेरेताई, सौ.निता घोडके, विमल जगताप, पिसाळताई, रंगाटे मावशी, प्रियंका मिसाळ, शर्मा भाभी आदी उपस्थित होते. संध्याकाळी ७ वाजता महाआरती करण्यात आली. नंतर प्रसादाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी परिसरातील नागरिक उपस्थित होते.

गुरू अर्जन देव सामाजिक प्रतिष्ठान व लायन्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा मराठा संस्थेच्या श्री सद्गुरू महाविद्यालय मेहेकरी येथे गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य विकास गोबरे, प्रा. विजय शिंदे आदी.

गुरू अर्जन देव सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने शालेय साहित्याचे वाटप

नगर – येथील गुरू अर्जन देव सामाजिक प्रतिष्ठान व लायन्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा मराठा संस्थेच्या श्री सद्गुरू महाविद्यालय मेहेकरी येथे गरीब व गरजू विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, वह्या व कंपास असे शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य विकास गोबरे व आयएमएस संस्थेतील प्रा. विजय शिंदे यांच्या हस्ते साहित्याचे वाटप झाले.

गोबरे यांच्या विनंतीचा स्वीकार करून घर घर लंगर योजनेचे प्रणेते हरजितसिंग वधवा, प्रशांत मुनोत, प्रितपाल धुप्पड, जनक आहुजा, राजेंद्र कंत्रोड, गुलशन कंत्रोड, कैलास नवलानी, करन धुप्पड यांनी शालेय साहित्य उपलब्ध करून शाळेला मदत केली. त्याबद्दल प्राचार्य गोबरे यांनी संस्थेचे आभार मानले.

यावेळी प्रा. शिंदे यांनी बोलताना विद्यार्थ्यांना इतरांना मदत करण्याचा हा संस्कार फार महत्वाचा असून तुम्ही देखील तो अंगिकारला पाहिजे असे सांगितले. ज्या प्रमाणे तुम्हाला मदत केली आहे तशीच तुम्ही देखील भविष्यात इतरांना मदत करा.

यावेळी पर्यवेक्षक सुरेखा लाटे रमेश चौधरी, हनुमंत शिंदे इतर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनंदा राशीनकर यांनी केले तर आभार भारती चौकडे यांनी मानले.

मंगल भक्त सेवा मंडळ ट्रस्टच्यावतीने नवनागापूर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना साहित्य वाटप

मंगलभक्त सेवा मंडळ (ट्रस्ट) कडून जि.प. शाळा नवनागापूर (ता. नगर) येथील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करताना सेवेकरी किर्तीकुमार कोठारी, बंडूनाना सप्रे, विजय शिरसाठ आदी.

नगर – मंगल भक्त सेवा मंडळ (ट्रस्ट) कडून १२ जुलै रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवनागापूर (ता. नगर) येथे शैक्षणिक वर्ष २०२४ –२५ करिता इ. १ ली ते इ. ७ वी पर्यंतच्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य स्वरूपात इ.१ ली ते ४ थी करिता थ्री इन वन व इ. ५ वी ते ७ वी करिता फुलस्केप वह्यांचे वाटप मंडळाचे सेवेकरी किर्तीकुमार कोठारी, आप्पासाहेब उर्फ बंडूनाना सप्रे व विजय शिरसाठ यांचे हस्ते मंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ कोठारी (भाऊ) यांच्या वतीने एक सामाजिक कार्य व दायित्व या भावनेतून करण्यात आले.

याप्रसंगी मंडळाचे सेवेकरी बंडूनाना सप्रे यांनी आपल्या मंडळाच्या वतीने चालू असलेल्या इतर उपक्रमांबाबत माहिती देऊन त्याचा उद्देश स्पष्ट केला. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून समाधान वाटले. तद्नंतर शाळेच्या मुख्याध्यापिका व सर्व सेवकवृंद यांनी शाळेच्या वतीने सद्गुरू श्री शंकरबाबा महाराज व आदरणीय गुरुवर्य श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (राजाभाऊ कोठारी) यांनी दिलेल्या मानवतेच्या शिकवणीची तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिलेल्या शैक्षणिक साहित्याप्रती आपल्या भावना व्यक्त करून भावी काळात असेच सहकार्य आपल्या मंडळाच्या वतीने राहील अशी अपेक्षा व्यक्त केली. आपल्या मंडळास या शाळेत विद्यार्थ्यांसाठी सेवा करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आल्याबद्दल बंडूनाना सप्रे यांनी शाळेचे आभार मानले.

आषाढी एकादशी निमित अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाच्यावतीने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात बाल पांडुरंग व वारकऱ्यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.

बाल पांडुरंग व वारकऱ्यांच्या हस्ते महाआरतीने आषाढी एकादशी साजरी

ब्राह्मण सेवा महासंघ व शिशुविहार बालवाडीचा उपक्रम

नगर – आषाढी एकादशी निमित अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाच्या वतीने सुयोग मंगल कार्यालयामधील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात बाल पांडुरंग व वारकऱ्यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. सकाळच्या रिमझिम पावसात शिशुविहार बालवाडीतील चिमुकल्या वारकऱ्यांची ज्ञानोबा तुकारामांचा गजर करत निघालेली बाल दिंडी सुयोग मंगल कार्यालयात वाजत गाजत आल्यावर दिंडीतील बाल पांडुरंग व वारकऱ्यांच्या हस्तेही महाआरती करण्यात आली. यावेळी ब्राह्मण सेवा महासंघाचे पदाधिकारी, पालक व नागरिक उपस्थित होते.

ब्राह्मण सेवा महासंघाचे अध्यक्ष किशोर जोशी प्रास्ताविकात म्हणाले, आषाढी एकादशी निमित्त दरवर्षी ब्राह्मण सेवा महासंघाच्यावतीने हा उपक्रम राबवला जात आहे. यासाठी शिशुविहार बालवाडीच्या बाल दिंडीतील विठ्ठल रुक्मिणी व बाल वारकरी आवर्जून येथे येत असल्याने ही महाआरती मोठ्या उत्साहात व भक्तीपूर्ण वातावरणात होत असते. सर्व जातींचे भाविक या उपक्रमात सहभागी होत असतात.

यावेळी सुनिता देव, राजेंद्र देव, दिनेश जोशी, विभव निसरगंड, तुषार तांबोळी, रोहिनी पुंडलिक, सतीश वैद्य, सोमनाथ मुळे, पंकज धर्माधिकारी, ज्योती कुलकर्णी, सागर गोवर्धन, अमोल कापरे, प्रसाद कुलकर्णी, महेश कुलकर्णी व वसंत कुलकर्णी आदी उपस्थित होते.

वारकरी संप्रदायची परंपरा जोपासण्याचे काम ज्ञानसाधना गुरुकुल करते : मनोज कोतकर

बालवारकऱ्यांची केडगाव देवी ते आरणगाव पायी वारी

केडगाव येथील ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेसच्यावतीने आषाढी एकादशीनिमित्त काढण्यात आलेल्या पायी दिंडीप्रसंगी माजी नगरसेवक मनोज कोतकर, उद्योजक जालिंदर कोतकर, मुख्याध्यापक संदीप भोरे, इतर शिक्षक वर्ग.

नगर – वारकरी संप्रदायची असलेली परंपरा जोपसण्याचे काम ज्ञानसाधना गुरुकुल करत आहे. या बाल वारकऱ्यांकडे पाहून केडगाव हे प्रति पंढरपूर असल्याचे वाटू लागले. विद्यार्थ्यांमध्ये या उपक्रमांच्या माध्यमातून आपली संस्कृती जोपसण्याचे कार्य चांगल्या पध्दतीने होत असल्याचे सांगून नगरसेवक मनोज कोतकर यांनी शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.

केडगाव येथील ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेसच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीचे आकर्षण म्हणजे एक हजारच्या पुढे विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते. ही दिंडी केडगाव मधील बालवारकऱ्यांचा सर्वात मोठा सोहळा ठरला. या पायी दिंडीसाठी विद्यार्थ्यांनी श्री विठ्ठल रुख्मिणी, संत तुकाराम महाराज, मीराबाई, मुक्ताबाई यांची वेशभूषा धारण करून सर्वांचे लक्ष वेधले. तर सर्व विद्यार्थी वारकऱ्यांच्या पोशाखात दिंडीत सहभागी झाले होते. केडगाव पासून आरणगाव येथील प्रती पंढरपूर समजले जाणारे विठ्ठलाचे मंदिर असे पायी दिंडीचे नियोजन होते. या पायी दिंडीचे केडगाव देवी मंदिरासमोर माजी नगरसेवक मनोज कोतकर व परिसरातील नागरिकांनी स्वागत केले.

उद्योजक जालिंदर कोतकर म्हणाले की, दरवर्षीप्रमाणे ज्ञानसाधना गुरुकुलचे सर्व विद्यार्थी पायी विठ्ठलाच्या भेटीला जात असतात. यावर्षी देखील सर्व बालवारकरी टाळ–मृदूंगाच्या गजरात हरीनामाचा जप करत वारीत सहभागी झाले. या धार्मिक उपक्रमाबद्दल त्यांनी सर्वांचे कौतुक केले.

मुख्याध्यापक संदीप भोर म्हणाले की,शिक्षणाबरोबर संस्कार देण्याचे काम ज्ञानसाधना गुरुकुल करत आहे. मुलांना शिक्षण देत असताना, संस्कार देणे सध्याच्या काळाची गरज बनली आहे. विविध धार्मिक कार्यक्रमातून ज्ञानसाधना मुलांना सतत संस्कार देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पायी दिंडीसाठी जगदंबा तरुण मंडळ, शिवमुद्रा ग्रुप, साई सेवा महिला मंडळ, मनोज कोतकर मित्र मंडळ, केडगाव बास्केट बॉल क्लब, बच्चन कोतकर, अजित कोतकर, संचालक भैरू कोतकर, रामदास ढवळे, अमित ढोरसकर, जगन्नाथ चेमटे, नवनाथ कोतकर, छबुराव कोतकर यांनी मुलांना फराळाचे वाटप करून पाण्याची व्यवस्था केली होती. तसेच कोतकर, ठुबे, ढवळे, क्षीरसागर, सुंबे, साई सेवा मंडळ यांनी दिंडीचे रांगोळी व पूजा करून स्वागत केले.

दिंडीसाठी रोहिणी ढोरसकर, पूजा ढोरसकर, सविता चेमटे, प्रतीक्षा चिमटे, मंदाकिनी चेमटे, रेणुका शिंदे, सविता शिंदे, वैशाली गवळी, मनीषा चेमटे, सीताबाई भस्मे, खेतमाळस, अनिता ठुबे, रोहिणी ठुबे, कल्याणी ठुबे, रुपाली ठुबे, दिपाली ठुबे, ऋतुजा ठुबे, स्वाती ठुबे, नंदा कोतकर यांचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमासाठी दत्तात्रय चेमटे, प्रशांत वारकड, संदीप कोतकर, नितीन ठुबे, अमोल कोतकर, गुलाब कोतकर, कैलास ठुबे, किरण खांदवे, शिक्षक शाहरुख शेख, रुचिता जमदाडे, शबाना शेख, कोमल शिंदे, प्रतिभा फुलारी, सुवर्णा दाणी, गीता रणखांब, संचालक प्रा. प्रसाद जमदाडे, लंडन किड्सचे सर्व शिक्षक, सहकारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

आषाढी एकादशीनिमित्ताने श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या धूत इंग्लिश स्कूलच्या बालचमूंनी रिंगण केले.

श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या धूत इंग्लिश स्कूलने केले बालचमुंचे रिंगण

नगर – आषाढी एकादशीनिमित्त श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना ज्युनिअर कॉलेजमध्ये प्राथमिक विभागाच्या बालचमुंनी रिंगण केले. भारतीय संस्कृती आणि भक्ती संप्रदाय या माध्यमातून जपण्याचा शाळेचा हा प्रयत्न स्तुत्य होता. शाळेच्या प्रवेशद्वारापासून महात्मा फुले चौकापर्यंत ही दिंडी नेण्यात आली व तेथे रिंगण करण्यात आले.

श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल राम अवतार मानधना ज्युनिअर कॉलेजच्या संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष व शाळा समितीचे चेअरमन नंदकुमार झवर, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना व राजेश झंवर सचिव डॉ. शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. राधिका जेऊरकर, समन्वयक संपदा देशपांडे, सुषमा उजागरे, श्रेयस गुंडू यांनी ही दिंडी यशस्वी करण्यासाठी नियोजन केले होते.

दिंडीच्या सुरुवातीला ढोल पथक होते. तर पारंपरिक वेशभूषेत नऊवारी साड्या आणि नेहरू शर्ट टोप्या घालून चिमुकले रांगेत उभे होते. विठ्ठल रुक्मिणी संत तुकाराम आदींची वेशभूषा मुलांना करण्यात आली होती. जी आकर्षणाचा विषय ठरली. लहान मुले आणि पालकांमध्ये संस्कृती रुजावी यासाठी हा उपक्रम घेण्यात आला.

असेंबली नंतर पारंपरिक पेहरावात आलेल्या मुलांनी गोल रिंगण करून पटांगणात प्रदक्षिणा मारली. नंतर दिंडीला सुरुवात झाली. दोन चिमुकल्या मुलांनी एक छोटी पालखी देखील खांद्यावर उचलली होती. भगवे ध्वज, टाळ, जय जय राम कृष्ण हरी चा गजर, तुळशी वृंदावन डोक्यावर घेतलेल्या मुली सर्व माहोल वारीमय झाला होता. महात्मा फुले चौकाच्या अलीकडे पुन्हा एकदा एक छोटे रिंगण करण्यात आले. तेथे मुलांनी आणि शिक्षकांनी फुगडी खेळून वारीचा आनंद लुटला.

मंगल भक्त सेवा मंडळ ट्रस्टकडून ‘दुर्गाष्टमी सोहळा’ उत्साहात साजरा

मंगलभक्त सेवा मंडळाकडून दुर्गाष्टमी पालखी सोहळ्याप्रसंगी श्री विश्वेश्वर (स्वामी महाराज भाऊ) व मंडळाचे पदाधिकारी.

नगर – एमआयडीसीमधील मंगल भक्त सेवा मंडळाकडून १४ जुलै रोजी दुर्गाष्टमी निमित्त श्री शंकर महाराज तथा श्री गुरुदत्त मंदिर मठात अतिशय भक्तिमय, रसमय व भावपूर्ण वातावरणात श्री शंकरगीता पारायण, भजन – प्रवचन, श्रींचा पालखी सोहळा व आरती तद्नंतर दर्शन सोहळ्यासह महाप्रसाद सोहळा पार पडला.

यावेळी श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (भाऊ) यांनी आषाढी एकादशी निमित्त विठू माऊली दरबारी अर्थात पंढरपूर वारीचे महत्त्व व २०० ते २५० कि.मी. अंतर वारकरी कशामुळे पार पडू शकतात हे उदाहरणासह विषद केले.

तसेच वर्षातील एका वारीमुळे पुढील वर्षभरातील काळात वारकरी कसा उत्साही व समाधानी राहतो हे स्पष्ट करून सांगितले. हा दुर्गाष्टमी सोहळा सद्गुरू श्री शंकर महाराज यांच्या कृपाशिर्वादाने एक वेगळाच अनुभव देऊन गेला. याप्रसंगी मंगल भक्त सेवा मंडळाचे सर्व सेवेकरी, सदस्य, भक्तगण उपस्थित होते.

धम्माल मनोरंजन

सुविचार

विचाराची संपत्ती ही माणसाच्या जीवनातली कामधेनु आहे.

दिनविशेष १९ जुलै २०२४

१९५८: पवन मल्होत्रा – भारतीय अभिनेते

१९४१: आशालता वाबगावकर – भारतीय चित्रपट अभिनेत्री (निधन: २२ सप्टेंबर २०२०)

१९३०: कार्लोस मेनेम – अर्जेंटिनाचे ५० वे राष्ट्राध्यक्ष

१९३०: ओ. व्ही. विजयन – भारतीय लेखक आणि चित्रकार (निधन: ३० मार्च २००५)

१९२६: विनायक आदिनाथ बुवा – विनोदी लेखक

१९२५: पॅट्रिक लुमूंबा – काँगो देशाचे पहिले पंतप्रधान (निधन: १७ जानेवारी १९६१)

१९२३: जवाहरलालजी दर्डा – लोकमतचे संस्थापक, संपादक वव स्वातंत्र्य सेनानी

१९२२: पिअर कार्डिन – फ्रेन्च फॅशन डिझायनर

१९१८: इंदुमती भट्टाचार्य – भारतीय राजकारणी, खासदार (निधन: २० एप्रिल १९९०)

१९०६: बेटे हान्स आल्ब्रेख्ट – अमेरिकन भौतिकीतज्ञ – नोबल पुरस्कार

१९०४: रेने लॅकॉस्ता – फ्रेंच लॉन टेनिस खेळाडू, पोलो टी शर्टचे जनक (निधन: १२ ऑक्टोबर १९९६)

१८८०: गणपतराव बोडस – श्रेष्ठ गायक आणि नट (निधन: २३ डिसेंबर १९६५)

१८७७: हेर्मान हेस – जर्मन लेखक – नोबेल पुरस्कार

१८६२: विल्यम हेन्री ब्रॅग – इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ – नोबेल पुरस्कार

आज यांची पुण्यतिथी

२०१८: ऍडमिरल जयंत नाडकर्णी – भारताचे १४वे नौसेनाप्रमुख – परम विशिष्ट सेवा पदक (जन्म: ५ डिसेंबर १९३१)

२०१३: डगलस एंगलबर्ट – कॉम्पुटर माउसचे शोधक (जन्म: ३० जानेवारी १९२५)

२०११: चतुरनन मिश्रा – भारतीय कामगार संघटनेचे कम्युनिस्ट नेते (जन्म: ७ एप्रिल १९२५)

२००७: दिलीप सरदेसाई – भारतीय क्रिकेटपटू (जन्म: ८ ऑगस्ट १९४०)

१९९९: मारिओ पुझो – अमेरिकन लेखक (जन्म: १५ ऑक्टोबर १९२०)

१९६१: अर्नेस्ट हेमिंग्वे – अमेरिकन लेखक – नोबेल पुरस्कार (जन्म: २१ जुलै १८९९)

१९५०: युसूफ मेहेर अली – समाजवादी नेते, स्वातंत्र्यसैनिक (जन्म: २३ सप्टेंबर १९०३)

१८४३: डॉ. सॅम्यूअल हानेमान – होमिओपाथी या वैद्यकीय उपचारपद्धतीचे जनक (जन्म: १० एप्रिल १७५५)

१७७८: रुसो – फ्रेंच विचारवंत, लेखक संगीतकार (जन्म: २८ जून १७१२)

१५६६: नॉस्टॉडॅमस – जगप्रसिद्ध फ्रेंच भविष्यवेत्ता (जन्म: १४ डिसेंबर १५०३)

आरोग्य

हृदय तथा रक्त संस्थानचे रोग

हृदय रोग

१. सफरचंदाचा मोरंबा ५० ग्रॅम, चांदीचा वर्ख लागून सकाळी सेवन करीत राहिल्याने हृदयाची अशक्तता वगैरे व्याधिंवर आराम येतो.

२. अर्ध्या जेवणानंतर अर्धा ग्लास पाण्यात थोडा सा आवळ्याचा रस टाकून प्यावा. नंतर बाकी जेवण करावे. २१ दिवस लागोपाठ हा उपाय केल्याने हृदयाचा अशक्तपणा दूर होतो.

३. कच्च्या बटाट्याच्या रसाने हृदयात होणारी जळजळ थांबते. खडी साखरे बरोबर पिकलेल्या चिंचेचा रस प्यायल्याने पण जळजळ थांबते.

४. ज्यांच्या हृदयाच्या धडकण्याचा वेग सामान्यांपेक्षा जास्त आहे अशा लोकांनी जेवणासोबत एक कच्चा कांदा खाल्यास आराम येतो व हृद्यास ताकत मिळते.

म्हणी व अर्थ

आपलेच दात नि आपलेच ओठ.

अर्थः शिक्षा करणारे आपणच आणि ज्याला शिक्षा करायची तोही आपल्यातीलच अशी अडचणीची परिस्थिती निर्माण होणे.

रुचिरा

बुंदी, शेव, बटाटे चाट

साहित्यः १ वाटी बुंदी, १ वाटी शेव, २-३ उकडलेले बटाटे, १ सफरचंदाच्या फोडी, अर्धे लिंबू, मीठ, साखर, थोडासा चाट मसाला.

साखरः बटाटे उकडून, सोलून गार होऊ द्यावे. नंतर त्याच्या लहान आकाराच्या फोडी कराव्या. फोडींना थोडे मीठ चोळावे. सफरचंदाची साले व बिया काढून त्याच्या बारीक आकाराच्या फोडी कराव्या फोडींना लिंबाचा रस लावून ठेवावा. नंतर सर्व एकत्र करुन चाट करावी.

शब्दरंजन



आडवे संकेत

१) पासपोर्ट चे मराठीत
४) बसण्याची चटई
७) दिराची पत्नी
९) करिता ११) निकड
१२) बेंच, वस्ताद
१३) स्त्रियांचा एक अलंकार
१६) दुःखाची वेदना
१८) धर्माला सोडून
१९) सरस्वती
२१) खुण, चिन्ह, ओळख
२३) प्रत्येक, हर
२४) वर्तुळ
२५) इंग्रजीत नख
२७) जुही नावाची फिल्म अभिनेत्री.
२८) रेतीवर रेषा काढून शकून पाहणे
२९) संपुर्ण
३१) सज्ज
३२) प्रधान, मंत्री
३४) एक चारचाकी वाहन
३५) मानपान
३६) ताब्यात घेणे
३७) कपडा लत्ता
३८) हुनर, गुण
४०) एका राज्याचे नाव
४२) जाण्यास पाबंध
४५) खेडे
४७) मोठी गोष्ट
४८) शंभर
४९) विजापूर चे हे प्रसिद्ध आहे.

उभे संकेत

२) राखणारा
३) त्रासलेला
५) वाकडातिकडा नव्हे असा
६) शुद्ध
७) व्यभिचार
८) पांढरा, स्वच्छ
१०) म व चा अक्षरबदल
१२) मै हूँ तु है कन्या कुमारी....
१४) पद्य
१५) सुवासिक, इच्छित वस्तु देणारी गाय
१७) देऊळ
१८) अग्नि
२०) श्रीकृष्ण २१) हटखोर
२२) एक संत २४) कमी
२६) चिमण्यांची ओरड
२८) मध्यान्हिची भयंकर उष्णता
२९) फरक
३०) जखम, मार
३३) लग्गा
३४) यंत्रशाळा
३५) एक प्रकारची बंगाली विद्या
३६) फालतु बकबक
३७) पक्का, खंबीर
३९) पुष्कळ, जास्त
४१) घोड्याच्या तोंडातील साखळी
४२) माळेतला प्रत्येक गोलक
४३) ईश्वर, देव
४४) इंग्रजी आचारी
४६) एक वृक्ष

कालचे उत्तर

इ	ज्ञ	त	दा	र	■	दी	ड	द	म	डी	चा	■
ति	■	■	मो	■	ध	न	■	फ	ळ	■	त	प
■	अ	व	द	सा	■	■	म	ण	■	अ	क	रा
उ	ल	■	र	■	व	त	न	■	■	ट	■	र्ध
दं	ग	ल	■	त	न	या	■	पा	क	क	ला	■
ड	■	वा	स	रु	■	र	वि	वा	र	■	ला	ली
■	ह	ज	र	■	■	■	डी	■	णी	■	ल	■
न	■	मा	स	ले	दा	र	■	■	■	वा	ज	वी
व	डी	■	नि	वा	रा	■	अं	■	गा	ल	प	ट
यु	■	क	र	पा	■	अं	त	रा	य	■	त	■
ग	र	■	स	टी	प	■	र	■	वा	■	रा	णी
वा	स	ना	■	ल	क्ष	दी	प	■	स	व	य	■
णी	■	र	वा	■	■	वा	ट	स	रु	■	■	■

Do you want to pass the
MPSC?

- पहिली आशियाई लोकसंख्या परिषद केव्हा व कोठे भरली होती? – १९६३ मध्ये दिल्ली येथे.
- भारतात कोणत्या वर्षी स्वतंत्र अणुऊर्जा खाते निर्माण करण्यात आले?- इ.स. १९५४ मध्ये.
- शून्याधिष्ठित अर्थसंकल्पाचे आद्य प्रवर्तक म्हणून कोणास मानले जाते? – पीटर पीहर.
- वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात केव्हा वाढ होते?– वस्तूंच्या किंमती स्थिर राहून उत्पादन वाढते तेव्हा.
- भारतातील सर्वाधिक रोजगार उपलब्ध करुन देणारा उद्योग कोणता?– कापड उद्योग.
- भारतातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सरकारने आखलेल्या कोणत्या धोरणास विशेष विरोध होतो? – प्रगतीशील कर कारणीला
- निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे काय? – स्थूल राष्ट्रीय उत्पन्न उणे घसारा.
- बदलत्या खर्चाचे उदाहरण म्हणून कशाचा उल्लेख करता येईल? –वीज.
- भारतातील लोकांच्या कल्याणात पुरेशी वाढ का झाली नाही? – राष्ट्रीय उत्पन्नाचे विषम विभाजन.
- प्रत्यक्ष कराचा जास्तीत जास्त परिणाम कशावर होतो?– उत्पन्न.
- शासनाने केलेल्या खर्चाची हिशोबतपासणी कोणती संसदीय समिती करते?– लोकलेखा समिती.
- जगातील कोणत्या देशाची सार्वजनिक वितरण प्रणाली सर्वात मोठी आहेत?– भारत.
- महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेचे जनक म्हणून कोणाला ओळखले जाते?– वि.स.पागे.
- भारताने नियोजनाचा स्वीकार कोणत्या देशाकडून केला आहे? –रशियाकडून.
- भारतासाठी नियोजनाची कल्पना सर्वप्रथम कोणी मांडली? – एम. विश्वेश्वरैय्या.
- आर्थिक नियोजनाचा प्रमुख उद्देश काय असतो?– ठराविक कालखंडात विकासाचे नियोजन उद्दिष्ट साध्य करणे व इष्टांकपूर्ती करणे.
- योजनाबद्ध आर्थिक विकासाचा पुरस्कार सर्वप्रथम करणारे राष्ट्र कोणते?– रशिया.
- भारताने कोणती नियोजन प्रमाणी स्वीकारली आहे?–लोकशाही.
- पहिल्या पंचवार्षिक योजनेचा कालखंड कोणता? – सन १९५१ ते १९५६.
- पहिल्या पंचवार्षिक योजनेत कोणत्या क्षेत्राला प्राधान्य दिले गेले? – शेती व जलसिंचन.
- कोणत्या पंचवार्षिक योजनेत सिंद्री येथे खत कारखाना उभारणी सुरु झाली?– पहिल्या.
- दामोदर खोरे योजना बहुउद्देशिय प्रकल्प कोणत्या पंचवार्षिक योजनेमध्येच सुरु करण्यात आला?– पहिल्या.
- २ ऑक्टोबर १९५२ रोजी समुदाय विकास कार्यक्रमास कोणत्या योजनाकाळात सुरुवात करण्यात आली?– पहिल्या.
- कोणत्या योजनेच्या काळातच खरेदी व ग्रामोद्योग आयोगाची रचना केली होती?– पहिल्या.
- पहिली पंचवार्षिक योजना कोणाच्या प्रणालीवर आधारित होती? – हेरॉड डोमार.
- कोणत्या पंचवार्षिक योजनेत समाजवादी समाजरचनेचे ध्येय निश्चित करण्यात आले?–दुसऱ्या.
- रुरकेला येथील पोलाद प्रकल्प उभारण्यास कोणत्या देशाचे सहाय्य लाभले?– पश्चिम जर्मनी.
- दुसरी पंचवार्षिक योजना कोणाच्या प्रणालीवर आधारलेली होती?– प्रा. महालोबिस.
- अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यावर कोणत्या योजनेत भर देण्यात आला?– तिसऱ्या.
- कोणती पंचवार्षिक योजना अनेक कारणांमुळे अनेक पातळ्यांवर बहुतांशी अपयशी ठरली असे विधान करता येईल?– तिसरी.
- तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत कोणत्या गोष्टीस प्राधाण्य देण्यात आले?– स्वावलंबी अर्थव्यवस्था निर्माण करणे.
- पशु विमा योजना कोणत्या पंचवार्षिक योजनेत सुरु करण्यात आली?– तिसऱ्या.
- तीन वार्षिक योजना कोणत्या पंचवार्षिक योजनांच्या दरम्यान राबविल्या गेल्या?– तिसऱ्या व चौथ्या.
- कोणत्या वार्षिक योजनेमध्ये दुसऱ्यांदा रुपयाचे अवमूल्यन करण्यात आले?– सन १९६६– ६७ च्या.

फिल्मीरंजन



आडवे संकेत

३) सन् १९९० में शशीलाल नायर के निर्देशन में बनी इस फिल्म में संजय दत्त, सनी देओल और अमृता सिंह थे.

५) सन् १९९४ में बनी फिल्म हम आपके है कौन का हिरो.

८) अग्निवर्षा इस फिल्म का एक नायक.९) दिप्ती (नायीका) १०) परेश रावल अभिनीत टाईटल रोलवाली फिल्म. ११) एक कुडी पंजाबन दिल चुराके ले गई...... १२) मिलो सजना (फिल्म) १३) जलाल (सहनायक)

१५) जिंदगी प्यार का गीत है जिसे हर दिल को गाना पडेगा.... यह गाना इस फिल्म का है.

१६) सन् १९९७ में निर्देशक सुनील अग्निहोत्री की इस फिल्म में अक्षय कुमार और रवीना टंडन थे. १८) श्रीवास्तव (सहनायक) १९) गंगवा इस फिल्म का हिरो.

२०) सन् १९८५ में रमेश सिप्पी के निर्देशन में बनी इस फिल्म में ऋषी कपूर, कमल हसन और डिम्पल कपाडिया थे. २२) सन् १९९९ में सनी देओल के निर्देशन में बनी इस फिल्म में सनी देओल, बॉबी देओल और उर्मिला मातोंडकर थे.

२३) सन् १९९४ में बनी फिल्म मोहरा की हिरोईन. (सिर्फ नाम)

२६) अग्निसाक्षी इस फिल्म का खलनायक.

२८) मोहब्बत का (फिल्म) २९) नंबर वन (फिल्म)

३०) चाची ४२० इस फिल्म का हिरो. ३१) ईना डिका (फिल्म)

उभे संकेत

१) सन् १९९४ में बनी फिल्म नाराज की हिरोईन.

२) सनी देओल, जुही चावला और शाहबाज खान अभिनीत फिल्म. ४) इस नामसे दो फिल्में बनी पहली में राजेश खन्ना, रिना रॉय, राकेश रोशन और दुसरी में अजय देवगन, करिश्मा कपूर और मनिषा कोईराला थे.

५) दिल के अरमां आसूओं में बह गये.... यह गाने की गायीका.

६) सन् १९९६ में निर्देशक गुलजार की इस फिल्म में चंद्रचुड सिंह, तब्बू और जिमी शेरगील थे. ७) हमारा (फिल्म)

१३) सन् १९९० में निर्देशक महेश भट्ट की इस फिल्म में अनील कपूर, गोविंदा और मिनाक्षी शेषांद्री थे. १४) सन् १९९९ में अंदलीब सुल्तानपुरी के निर्देशन में बनी इस फिल्म में सलमान खान और उर्मिला मातोंडकर थे.

१५) विवेक मुश्रान अभिनीत पहली फिल्म. १७) सन् १९९६ में बनी फिल्म लोफर का हिरो.

१८) सन् २००२ में बनी फिल्म रोड की हिरोईन. २१) जैन (संगीतकार) २४) राणा (नायक) २५) मुनीम (नायीका) २७) स्मिता (नायीका)२९) सन् १९९१ में बनी इस फिल्म में ऋषी कपूर, जेबा बख्तियार और अश्विनी भावे थे.

मागील फिल्मी उत्तर

सु	दे	श	भो	स	ले	■	सै	फ	अ	ली	खा	न
रे	■	त्ती	■	फ	■	मे	ला	■	क	■	■	■
श	म्मी	क	पू	र	■	ज	ब	ज	ब	फु	ल	■
ओ	■	पु	■	■	जो	र	■	■	र	■	■	बि
बे	■	र	वी	ना	■	सा	ज	न	■	जी	व	न
रॉ	य	■	■	गा	■	ब	■	म्र	■	ग	■	■
य	■	■	अ	र्जू	न	■	सि	ता	औ	र	गी	ता
■	■	अ	मा	न	■	■	■	शि	■	■	■	ल
ढा	■	■	न	■	■	■	फि	रो	ज	खा	न	■
ई	जा	ज	त	■	■	क	■	ड	■	ति	■	बे
अ	■	वा	■	च	र	स	■	क	बी	र	बे	दी
क्ष	■	नी	■	ल	■	म	द	र	■	■	द	■
र	ती	■	■	ते	री	■	स	■	■	ग	र्दी	श

आषाढी एकादशीनिमित्त माळीवाडा येथील शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर परिसरातील श्री संत सावता महाराज विठ्ठल-रुख्मिणी मंदिरात आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते महापूजा झाली.

‘स्वच्छ व सुंदर शहर’ संकल्पना नगरमध्ये प्रत्यक्षात उतरविणार

आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रतिपादन; माळीवाडा येथील विठ्ठल-रुख्मिणी मंदिरात महापूजा

नगर - आज अवघा महाराष्ट्र हा विठ्ठलमय झाला आहे, अनेकजण पंढरीच्या वारीला गेले आहे. गेल्या १०-१२ दिवसांपासून अनेक दिंड्या नगर शहरातून पंढरपुरकडे मार्गस्त झाल्या. या दिंड्यांचे महानगरपालिकेच्यावतीने स्वागत करुन त्यांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्यात आल्या. तसेच शहरातील सामाजिक संस्था, ग्रुप, दानशुरांनी या वारकऱ्यांची सेवा केली. आज आषाढी एकादशीनिमित्त शहरातील विविध मंदिरात धार्मिक विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात भाविक मोठ्या भक्तीभावाने सहभागी झाले आहेत. पांडूरंगाने सर्वांचे संकटे दूर करुन शहरात सुख-समृद्धी नांदू दे! अशी प्रार्थना आपण विठ्ठल चरणी केली आहे. मनपाच्या माध्यमातून शहरातील नागरिकांना सर्वसुविधा देण्याचा मानस आहे. स्वच्छ व सुंदर शहर ही संकल्पना नागरिकांच्या सहकार्याने प्रत्यक्षात उतरविणार असल्याचे प्रतिपादन मनपाचे आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

आषाढी एकादशीनिमित्त माळीवाडा येथील शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर परिसरातील श्री संत सावता महाराज विठ्ठल-रुख्मिणी मंदिरात आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते महापूजा झाली. याप्रसंगी देवस्थाचे अध्यक्ष अ‍ॅड. अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडित खरपुडे, सचिव अशोक कानडे, विश्वस्त पांडूरंग नन्नवरे, रंगनाथ फुलसौंदर, विजय कोथिंबीरे, गजानन ससाणे, प्रा.माणिकराव विधाते, नितीन पुंड, राजाभाऊ मुळे, बबन गोरे, गणेश राऊत उपस्थित होते.

याप्रसंगी बोलतांना अभय आगरकर म्हणाले, गेल्या काही दिवसांपासून विविध दिंड्या, विविध मंदिरातील धार्मिक कार्यक्रम, शाळांमधील विद्यार्थ्यांच्या आकर्षक दिंड्यामुळे संपूर्ण शहरातील वातावरण भक्तीमय झाले होते. भक्त आणि देव यांच्या भेटीचा आजचा हा आषाढी एकादशीचा सोहळा विलोभनीय असाच आहे. माळीवाडा देवस्थानच्यावतीने भाविकांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या असल्याचे सांगितले.

या सर्व कार्यक्रमांस भाविकांनी गर्दी केली होती. तसेच भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात येत होते. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषनाई केली होती. श्री विशाल गणेश सेवा मंडळाचे सदस्य परिश्रम घेत होते. नगर शहरासह केडगांव, स्टेशनरोड, सारसनगर, दाळमंडई, आडते बाजार, बुरुडगांव रोड, सावेडी उपनगरातील, भिंगार, गवळीवाडा येथील विविध विठ्ठल-रुख्मीणी मंदिरात भाविकांनी पहाटेपासूनच गर्दी केली होती. उपवासाच्या पदार्थांची रेलचेल आणि बालगोपाळांची वेषभूषा, सोशल मिडियावर सकाळपासूनच आषाढीची धूम दिसून येत होती.

पुढची पिढी सक्षम होण्यासाठी साहित्य संमेलन आवश्यक

आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; पंधरावे राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन स्मरणिकेचे प्रकाशन

नगर - पुढची पिढी सक्षम होण्यासाठी साहित्य गरजेचे असून शब्दगंध च्या वतीने करण्यात येत असलेले प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत, साहित्यिक आणि साहित्य रसिकांना एकत्र करून साहित्य चळवळीची दिशा निश्चित करण्याचे काम साहित्य संमेलनातून होत असतं.साहित्य संमेलन घेऊन सर्वांना विचारपिठावर संधी देण्याचे काम शब्दगंध करत आहे. ही अतिशय कौतुकास्पद बाब आहे, असे मत आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केले.

शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने पंधराव्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनाच्या स्मरणिकेचे प्रकाशन प्रसंगी अध्यक्षपदावरून ते बोलत होते. यावेळी विचारपिठावर भाषा सल्लागार समितीचे सदस्य जयंत येलुलकर, प्राचार्य शिवाजीराव देवढे, प्रा.मधुसूदन मुळे, प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, डॉ. जी.पी ढाकणे, चंद्रकांत भोसले, बापूसाहेब भोसले, ज्ञानदेव पांडुळे, शशिकांत नजान, नाट्य परिषदेचे प्रसाद बेडेकर, अमोल खोसे, शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, संस्थापक सुनील गोसावी इत्यादी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, पुढच्या पिढीला वैचारिक वारसा द्यायचा असेल तर त्यासाठी पुस्तके वाचणे अत्यंत आवश्यक आहे. शारीरिक क्षमते इतकीच वैचारिक क्षमता महत्त्वाची असून वाचनासाठी वेळ देणे गरजेचे आहे. शब्दगंध च्या वतीने राबविण्यात येत असलेले साहित्यिक उपक्रम निश्चितच प्रेरणादायी आहेत. अहमदनगर शहरात सातत्याने होत असलेल्या शब्दगंध च्या कार्यक्रमाची दखल सर्वत्र घेतली जात आहे, ही कौतुकास्पद बाब आहे.

प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यावेळी बोलताना म्हणाल्या की, साहित्यिक चळवळ जिवंत ठेवण्याचे काम शब्दगंध ने केलेले असून लिहितात त्यांना हे बळ देत आहेत. चळवळी या अचानक उदयास येत नसून त्यासाठी मोठा त्याग आणि परिश्रम करण्याची तयारी असावी लागते.

डॉ. संजय कळमकर बोलताना म्हणाले की, साहित्यिकांनी इतरांचे वाचले तर आपले साहित्य सकस निर्माण होऊ शकते, त्यासाठी वाचायला हवे. कथा कवितांच्या कार्यशाळेतून नवनवे साहित्यिक निर्माण होऊ शकतात.

यावेळी प्रसाद बेडेकर,जयंत येलुलकर, शब्दगंध चे संस्थापक सुनील गोसावी,नेवासा शाखेचे अध्यक्ष प्रा.डॉ. किशोर धनवडे यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते सुनील गोसावी, भगवान राऊत व शर्मिला गोसावी यांनी संपादित केलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

शब्दगंधच्या वतीने अभिवाचन स्पर्धेत सहभागी होऊन चाळीसगाव येथे सादरीकरण केल्याबद्दल सुफी सय्यद, राज्य नाट्य स्पर्धेत पहाट पक्षी नाटकाचे दिग्दर्शक संजय लोळगे व अभिनेत्री स्वानंदी भरताल, अनन्यता काव्यसंग्रहाच्या सरोज आल्हाट, कविवर्य चंद्रकांत पालवे, प्रा. मेधाताई काळे, शाहीर अरुण आहेर, सुरेखा घोलप यांच्यासह साहित्य संमेलन यशस्वी करणाऱ्या सर्व टीमचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शर्मिला गोसावी यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.डॉ.अशोक कानडे यांनी केले. शेवटी संयोजन समितीचे अध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे यांनी आभार मानले.

यावेळी ग्राहक मंचचे अध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर, कॉ. नाना कदम, शब्बीर शेख, संजय भिंगारदिवे, बैचे सर, शरद गडकर,सुधीर फडके, शशिकांत गायकवाड, संतोष कानडे, शशिकांत घोडके, सरला सातपुते, प्राचार्य अशोक दौंड, अरविंद बटुळे, सत्यप्रेम गिरी, बाबासाहेब शिंदे,डॉ. रमेश वाघमारे, शिवाजी साबळे, पॉल भिंगारदिवे, कोपरगाव शाखेच्या मधुमिता निळेकर,अनिल साळवे, गणेश भगत, प्रसाद बनसोडे,जालिंदर बोरुडे, गौरव भुकन उपस्थित होते.

यावेळी सुभाष सोनवणे यांनी सूत्रसंचालन केलेल्या काव्य संमेलनात अरविंद ब्राह्मणे, अरुण आहेर, अनिल गायकवाड, मारुती सावंत, शाहीर वसंत डंबाळे, शामा मंडलिक, सुदर्शन धस, प्रबोधिनी पठाडे, पांडुरंग रोडगे, दिगंबर गोंधळी, सुदर्शन धस यांनी कवितांचे वाचन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुभाष सोनवणे, शाहीर भारत गाडेकर, बबनराव गिरी, सुनील धस, प्रा.डॉ. तुकाराम गोंदकर, राजेंद्र फंड, राजेंद्र चोभे,स्वाती ठूबे, राजेंद्र पवार, डॉ.अनिल पानखडे, डॉ.किशोर धनवटे, जयश्री झरेकर, बाळासाहेब शेंदूरकर, ऋषिकेश राऊत, हर्षली गिरी,आरती गिरी, शर्मिला रणधीर, कल्याणी सावंत यांनी विशेष परिश्रम घेतले.

सी.ए.फायनल परिक्षेत श्वेताली मगर हिचे यश

नगर - इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट ऑफ इंडिया यांच्यावतीने मे महिन्यात घेण्यात आलेल्या सीए फायनल परिक्षेत कु.श्वेताली मगर ही चांगल्या गुणांसह उत्तीर्ण झाली. तिने सीए अमृत पटेल व सीए प्रसाद भंडारी यांच्याकडे आर्टिकलशिप पुर्ण केली.

श्वेताली मगर हीचे इ.१० वी पर्यंतचे शिक्षण श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेत तर पदवीपर्यंतचे शिक्षण पेमराज सारडा कॉलेज येथे झाले आहे. नवलेनगर, गुलमोहोर रोड येथील रहिवासी व शिक्षक बँकेचे निवृत्त सिनिअर अकौंटंट स्व.संजय मगर यांची ती कन्या आहे. कु.श्वेताली मगर हीने वडिलांचे स्वप्न पूर्ण केल्याची भावना आई सुवर्णा मगर यांनी व्यक्त केली.

प्रियदर्शनी स्कूलमध्ये अवतरली पंढरी

भिंगार - भिंगार येथील प्रियदर्शनी पब्लिक स्कूल या शाळेत आषाढी एकादशीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी संतांच्या पादुकांची पालखी व दिंडीचे आयोजन केल्यामुळे साक्षात पंढरपूर अवतरले.

विठ्ठल नामाचा जयघोष, संत जयघोष, ग्रंथदिंडी, फुगडी, नृत्य, भजने, अभंग आणि वारकऱ्यांची मांदीयाळी यामुळे संपूर्ण शाळा व टाळमृदुंगाचा भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाली.

यावेळी विद्यार्थ्यांनी अभंगवाणी सादर केली तसेच विद्यार्थी आणि शिक्षकांनी फुगडी व भक्तीरसात नाचून हरीपाठ आणि गोल रिंगण सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यावेळी प्रमुख पाहुण्या सौ. संपदा चौधरी यांनी अभंग सादर करून सर्व परीसर भक्तीयुक्त केला व त्यांच्याच गोडवाणीने पसायदानाने या कार्यक्रमाची सांगता झाली यावेळी तबला वादक शेखर दरवडे यांनी साथसंगत दिली.

याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या श्रीमती अंजली बोधक, उपप्राचार्य अमोल घोरपडे सर, पर्यवेक्षक अनिता थापा सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पा भोसले मॅडम आणि आभार मनिषा पवार यांनी मानले.

भिंगार येथील प्रियदर्शनी पब्लिक स्कूल शाळेत आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांनी संतांच्या पादुकांची पालखी व दिंडीचे आयोजन केले होते. पादुका पालखीची पूजा करताना सौ. संपदा चौधरी, प्राचार्या अंजली बोधक, अनिता थापा आदी.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीची नवीन मराठी शाळा विश्रामबागमध्ये आषाढी एकादशी निमित्ताने बालदिंडी सोहळ्यात सहभागी झालेले विद्यार्थी व शिक्षक.

बालवारकऱ्यांनी दिला वृक्षसंवर्धन व स्वच्छतेचा संदेश

नगर - अहमदनगर एज्युकेशन सोसायटीची नवीन मराठी शाळा विश्रामबाग मध्ये आषाढी एकादशी निमित्ताने बालदिंडी सोहळा झाला. फेरी दरम्यान बालवारकऱ्यांनी वृक्ष संवर्धन आणि स्वच्छतेचा संदेश दिला.

या दिंडीमध्ये बालवाडी पासून सातवी पर्यंतचे विद्यार्थी सहभागी झाले होते. अनेक छोटी मुले विठ्ठल, रुख्मिनी, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर अशा विविध संतांचा वेष धारण करून आले होते. तर इतर सर्व विद्यार्थी वारकरी पोशाखात आले होते. प्रशालेत विठ्ठल रुख्मिनी प्रतिमा पूजन आणि आरती नंतर दिंडी सोहळ्याला सुरूवात झाली. नवीन मराठी शाळा विश्रामबाग, पंचपीर चावडी, विशाल गणपती मंदिर, वाडिया पार्क असा फेरा करत बालदिंडी पुन्हा शालेत आली. संगीत शिक्षक सौरभ खेडकर यांनी इयत्ता सातवी च्या विद्यार्थ्यांचा अभंगाच्या चालीवर बसवलेले पाऊले नृत्य विशाल गणपती मंदिरा समोर सादर करण्यात आले. त्यास उपस्थित भाविक भक्तांनी टाळ्या वाजवत प्रतिसाद दिला. कला शिक्षक वैभव मदने यांनी सुंदर पालखी बनवली होती.

यावेळी मुख्याध्यापिका उज्वला कळमकर, बालवाडी इनचार्ज दारुणकर, संगीता भंडारी, पारुनाथ ढोकळे, लीना पाटोळे, रवी चांदेकर, दीपक कराळे, कविता धर्माधिकारी, योगिता कासार, कोमल झिने, मयूर धाडगे, गणेश चौरे, तुकाराम पवार, सिमरन मोमीन, खेडकर, अजहर सय्यद आदी उपस्थित होते.

तारकपूरला सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये अवतरली पंढरी

टाळ मृदंगाच्या तालावर रंगला विद्यार्थ्यांचा दिंडी सोहळा

तारकपूरला सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमधून निघालेल्या शालेय दिंडीत सहभागी झालेले विद्यार्थी विठ्ठलनामाचा गजर करताना. दिंडी घेतलेले शिक्षकवर्ग. संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापिका गोदावरी किर्तानी व शिक्षिका.

नगर - आषाढी एकादशी निमित्त अवघा महाराष्ट्र पंढरपूरच्या विठुराया चरणी लीन झाला. याच निमित्त तारकपूर येथील सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी भव्य दिव्य दिंडी सोहळा साजरा केला. मेघाग्री चौकातून या बाल वारकऱ्यांच्या दिंडीला सुरूवात झाली. वारकरी वेशभूषा, हातात भगव्या पताका, टाळ मृदंगाचा गजर आणि मुखी हरिनामाचा गजर करीत निघालेल्या दिंडीत हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी लेझीमचे डाव सादर केले. प्राथमिकच्या विद्यार्थ्यांनी सुरेल टाळ वादन केले. शाळेत दिंडीचे औक्षण करून स्वागत करण्यात आले.

शाळेत लेझीमचे डाव सादर झाल्यानंतर पूर्व प्राथमिकच्या चिमुरड्यांनी विठ्ठल नामाची शाळा भरली या गीतावर नृत्याविष्कार सादर केला. संत गोरा कुंभार यांच्या पांडुरंग भक्तीलरील नाटिकेने उपस्थितांचे डोळे पाणावले. विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीची महती सांगून ज्ञानेश्वरांनी रेड्यामुखी वेद वदवला तसेच ‘ताटी उघडा ज्ञानेश्वरा’ या नाटिका सादर केल्या. शाळेच्या प्रांगणात पंढरपूर अवतरल्याची अनुभूती भक्तीमय वातावरणामुळे आली.

यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष रामचंद मेंघानी म्हणाले, कोट्यवधी भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या पंढरपूरच्या पांडुरंगाचे दर्शन आजच्या सुंदर कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी घडवले. आषाढी वारी, वारकरी संप्रदाय महाराष्ट्राचे अध्यात्मिक वैभव आहे. निस्सीम भक्ती, नाम स्मरणाचे महत्त्व वारीत अनुभवता येते. विद्यार्थ्यांनी हीच वैभवशाली परंपरा जपत दिंडी सोहळा साजरा केला. याकामी शिक्षकांनी घेतलेल्या परिश्रमाचेही त्यांनी कौतुक केले.

कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सेक्रेटरी गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर मखिजा, ट्रस्टी राजकुमार गुरनानी, सुरेश हिरानंदानी, हरेष मध्यान, प्राचार्या गीता तांबे, उपप्राचार्य कंचन पापडेजा, मुख्याध्यापिका गोदावरी किर्तानी आदी उपस्थित होते.

प्रोग्राम हेड कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली सीमा कोटस्थाने, इशरत शेख यांनी सूत्रसंचालन केले. बाळासाहेब गुंजाळ, मनीष लांडे, शिरीन शेख, मनीष आहुजा, आशा रंगलानी, दिव्या पोखरणा, समिना शेख, रुचिता सारडा आणि इतर सर्व शिक्षक यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका गोदावरी किर्तानी यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील शिक्षिका करिष्मा नवलानी, भावना ढाले, अश्विनी देशपांडे, अनामिका म्हस्के, नयन तुपे, बाळासाहेब पठारे आदींनी परिश्रम घेतले.

नेप्तीत मोहरमनिमित्त सामाजिक एकतेचे दर्शन

नगर तालुक्यातील नेप्ती येथे मोहरमच्या दहाव्या दिवशी गावातील नालसाब, इमाम कासम, मौला अली यांच्या सवारीसह ताबूतचे धार्मिक वातावरणात विसर्जन करताना हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकतेचे दर्शन घडविले. समवेत फायक सय्यद, वसंत पवार, बाबूलाल सय्यद, जावेद सय्यद आदी.

नगर - नगर तालुक्यातील नेप्ती येथे मोहरमच्या दहाव्या दिवशी गावातील नालसाब, इमामी कासम, मौला आली यांच्या सवारीसह ताबूतचे धार्मिक वातावरणात विसर्जन करण्यात आले. गावातील मोहरमच्या विसर्जन मिरवणुकीत युवकांसह हिंदू-मुस्लिम समाजातील बांधवांनी सहभागी होवून सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडविले.

यावेळी माजी उपसरपंच फारूक सय्यद, मार्केट कमिटीचे माजी संचालक वसंत पवार, समता परिषदेचे तालुकाध्यक्ष रामदास फुले, उपसरपंच दादू चौगुले, पोलीस पाटील अरुण होले, शिवाजी होळकर, मुनीर सय्यद, प्रा. एकनाथ होले, भानुदास फुले, बाबूलाल सय्यद, जावेद सय्यद, जमीर सय्यद, गुलाब सय्यद, साजिद सय्यद, हुसेन सय्यद, संतोष चहाळ, कारभारी जपकर, उमर सय्यद, युनुस सय्यद, नौशाद शेख, सिकंदर शेख, मुख्तार सय्यद, सलीम सय्यद, कय्युम सय्यद, बादशाह सय्यद, वाजिद सय्यद, नसीर सय्यद, शाहबाज सय्यद, साहिल सय्यद, अरबाज शेख, रमिज सय्यद, आदिल सय्यद, आशिष शेख, महबूब सय्यद, नवेद शेख, बादशहा सय्यद, एजाज सय्यद, हन्सार सय्यद, बबन सय्यद, रंगनाथ जपकर, राहुल गवारे, रफिक सय्यद, आसिफ शेख, नितीन पवार आदींसह ग्रामस्थ सहभागी झाले होते.

दरवर्षीप्रमाणे गावातील हिंदू मुस्लिम युवक एकत्र येऊन मौलाना हुसेन सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली सवाऱ्यांची स्थापना केली होती. स्थापनेच्या दिवशी नाले हैदर यंग पार्टीच्या वतीने इमामवाडा परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तसेच दहा दिवस गावात इमाने हसन-हुसेन यांनी धर्मासाठी दिलेल्या बलिदानाची माहिती देणाऱ्या मजलीसचे आयोजन करण्यात आले होते. मजलीसनंतर भाविकांमध्ये प्रसादचे वाटप करण्यात आले. दहा दिवस गावात धार्मिक वातावरणात मोहरम उत्सव शांततेत पार पडला.

मोहरमच्या आठव्या दिवशी रात्री १२ वाजता सवारीची मिरवणूक काढण्यात आली. नवव्या दिवशी कत्तलच्या रात्री व यहाच्या दिवशी पारंपारिक वाद्यात सवाऱ्यांची मिरवणूक निघाली होती. चौका-चौकात सवारीवर भाविकांनी चादर अर्पण केली. यावेळी भाविकांना सरबतचे देखील वाटप करण्यात आले. पवार मळा येथील विहिरीत सवाऱ्यांचे विसर्जन करण्यात आले.

14TH JULY 2024

व्हायोलिन अ‍ॅकेडमी नगर व स्वरझंकार, पुणे आयोजित ‘स्वरमल्हार’ संगीत महोत्सवाचे उद्घाटन तेजस उपाध्ये, महेश लेले यांच्या हस्ते झाले. समवेत सितारवादक पद्मश्री उस्ताद शाहिद परवेझ व व्हायोलिन वादक पंडित अतुलकुमार उपाध्ये.

स्वरमल्हारच्या संगीत स्वरसरींनी नगरकर रसिक चिंब

नगर - व्हायोलिन अ‍ॅकेडमी अहमदनगर व स्वरझंकार, पुणे यांच्यावतीने नुकतेच नगरमध्ये ‘स्वरमल्हार’ संगीत महोत्सव साजरा झाला. विख्यात गायक मनू श्रीवास्तव यांच्या शिष्या संयुक्ता अमरनाथ आणि विद्या देसाई यांच्या गायनाच्या जुगलबंदीने कार्यक्रमाच्या पहिल्या सत्राची बहारदार सुरवात झाली. त्यांनी राग हंसध्वनी अतिशय सुंदररीत्या सादर केला. दुसऱ्या सत्रात पं.काशिनाथ बोडस यांचे शिष्य व फोनिक्स घराण्याचे गायक मनू श्रीवास्तव यांनी राग मारू बिहाग व राग गौड मल्हार सादर करून रसिकांची मने जिंकली. त्यांना अजिंक्य जोशी (तबला) व अभिषेक शिनकर (हार्मोनिअम) यांनी साथ केली.

शेवटच्या सत्रात जगप्रसिद्ध सितार वादक पद्मश्री उस्ताद शाहिद परवेझ आणि जागतिक किर्तीचे व्हायोलिन वादक पंडित अतुलकुमार उपाध्ये या दोन्ही दिग्गजांच्या जुगलबंदीने रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांनी राग मेघ, राग पिलू आणि राग काफी सादर केला. ज्येष्ठ तबलावादक पं. मुकेश जाधव यांनी तबला साथ केली. या त्रयींनी रसिकांना संगीताची वेगळी अनुभूती दिली.

संस्कार भारतीचे अध्यक्ष अ‍ॅड दीपक शर्मा, सचिव विलास बडवे, पु.ना. गाडगीळचे श्री.कोलते, लोकमान्यच्या सौ.स्वस्तिश्री गरूड यांच्या हस्ते कलाकारांचा सत्कार करण्यात आला. मनपाच्या माजी सभापती सौ. पुष्पाताई बोरुडे यांचे हस्ते पंडित अतुल कुमार उपाध्ये यांचा सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचलन आनंद कुलकर्णी यांनी केले. या कार्यक्रमास इटामैक्स, मानस इंडस्ट्रीज, चिंतामणी आर्ट गॅलरी व व्ही स्टार यांचे मौलिक सहकार्य लाभले.

अशा या शास्त्रीय संगीत कार्यक्रमाचे आम्ही दरवर्षी आयोजन करीत असून हा उपक्रम पुढेही सुरू राहणार आहे, असे मत व्हायोलिन अ‍ॅकेडमीचे महेश लेले यांनी व्यक्त करून आभार मानले.

1 BHK फ्लॅट विकणे

कॉटेज कॉर्नर, सावेडी अहमदनगर. प्रशस्त लोकेशनला सदर फ्लॅट आहे. हायवे, शाळा, हॉस्पिटल व एमआयडीसीजवळ आहे.

7020119334
9421272583

दोन बेडचा फ्लॅट भाड्याने देणे आहे

सिव्हिल हॉस्पिटलजवळील लोकमत शेजारी, कोहिनूर प्लाझा मधील दोन बेडचा फ्लॅट भाड्याने देणे आहे.

9881141240

जागा भाड्याने देणे

साईदीप हॉस्पिटलजवळ, १२५० पत्राशेड व आरसीसी बांधकाम ३२५०

११००० स्क्वे.फूट जागा गोडावूनसाठी भाड्याने देणे.

7720013325

पार्टटाईम कामासाठी मुले पाहिजे

पुस्तकाच्या दुकानातील कामासाठी होतकरू **मुले पाहिजे.**

माऊली वितरण/ माऊली पुस्तकालय
शनि चौक,अहमदनगर
9011009134, 9011009135

पाहिजेत

कापडाच्या दुकानात कामासाठी पाहिजे

सेल्समन : २०
कॉम्प्युटर ऑपरेटर : ३
कॅशिअर : १
हेल्पर : १०

9689071356

Required

Two post for
Realtionship Manager
Garadute person
preferred Fresher can apply Job profile - same like devlopment officer of lic
- Area -
Ahmedangar district

Nj wealth
Ahmednagar
7350005115

Required

* **Office Assistant : 1** (Graduation)
* **Accotant : 1** (M.com B.com)
Minimum 1 year experience

Rajmudra Transport Agency
MIDC, AHMEDNAGAR , MO : 9881478711

Required

Graphic Designer - 1	Office Assistant - 1
Digital Marketing Executive - 2	Office Boy - 1 (Cleaning & maintenance)

Date of Interview : 19th & 20th July 2024 / Time : 04 to 6 pm

Location Of Interview -
NMS Group of Companies
JKK Tower
C-2, 3rd Floor
Opposite Bansod Classes,
Gulmohar Road, Ahmednagar.
Mo. 9923976976

2BHK लक्झरीअस फ्लॅट भाड्याने देणे

मार्केटयार्डजवळ, मधूबन अपार्टमेंट,पहिला मजला, राजधन हॉटेल शेजारी, मेनरोडवर, स्वतंत्र नळ, पाणी टाकी, पार्किंग सुविधा (ऑफिससाठीही उपयुक्त)

9822066381

भाडेतत्वावर देणे आहे

लालटाकी रोड अ.नगर येथील
कालिका प्राईड मध्ये
३३० स्क्वे. फुट गाळा
बँक, पतसंस्था, ऑफिस, बॅक ऑफिस, क्लिनिक इ. करिता भाडेतत्वावर देणे आहे.

○ त्वरीत संपर्क ○
98500 63432

मोक्याची जागा भाड्याने देणे

कार्यालय,गोडाऊन, निवास,एजन्सी ई.करीता तळ मजल्यावरील चौकातील मोक्याची जागा, ७ खोल्या उपलब्ध.

जुना मंगळवार बाजार ,
कॅप्टन राजाभाऊ कुलकर्णी मार्ग,अ.नगर.
7770027505

पाहिजेत

- सेल्समन
- हेल्पर

(पूर्णवेळ)

कापड दुकानातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.

जरीवाला
कापड बाजार,अहमदनगर.

VSP फायनांशियल सर्व्हिसेस बँकेच्या टेली कॉलिंग साठी

महिला/मुली त्वरित पाहिजेत

जागा – १०

बायोडाटा व आधारकार्ड झेरॉक्स, फोटोसह समक्ष भेटावे.

३ रा मजला, शिव-पार्वती अपार्टमेंट,
बालिकाश्रम रोड, अ.नगर.
मो. 8308090765

WE ARE
Hiring!
JOIN OUR TEAM

पाहिजेत

रिक्त पदे	जागा	लिंग	पात्रता	अनुभव
१. सर्व्हिस मॅनेजर	१	स्त्री / पुरुष	डिप्लोमा इलेक्ट्रिक / मेकेनिक	किमान १-२ वर्षे ऑटोमोबाईल क्षेत्रात काम केल्याचा अनुभव आवश्यक
२. सर्व्हिस टेक्निशियन	३	पुरुष	ITI / 12 वी पास	
३. सेल्स कन्सल्टंट	४	स्त्री / पुरुष	12 वी पास	
४. टेलीकॉलर	२	स्त्री	12 वी पास	
५. बॅक ऑफिस एक्झिक्यूटिव्ह	१	स्त्री	12 वी पास	इन्शुरन्स व आरटीओ कामाची माहिती आवश्यक

वॉक-इन मुलाखती पुढील 5 दिवसांसाठी, सकाळी 10 ते दुपारी 1:30 पर्यंत सुरू आहेत.

एथर स्पेस एक्सपिरीयन्स सेंटर, अहमदनगर
पत्ता: सिना नदी ब्रिज जवळ, नगर -पुणे रोड, अहमदनगर
आपला CV मेल करा saleshead@ather-hkev.in
किंवा व्हाटसअॅप करा: 750787 7777

ATHER

भाडेतत्वावर देणे आहे

श्री समर्थ हाईटस् प्रेमदान हडको चौक, नवीन इमारतीमध्ये ५५० चौ.फूट पॉश. सर्वसोयींनीयुक्त जागा, कार्यालय, दुकान, पतसंस्था इ.करिता अतिशय उपयुक्त. भाडेतत्वावर देणे आहे.

संपर्क : **9850221511**

---

2 BHK फ्लॅट विकणे

कॅपिटल अपार्टमेंट, पटेलवाडी मंगल कार्यालयसमोर टिळक रोड येथील फ्लॅट विकणे आहे.

9420218530

---

ekart LOGISTICS मध्ये मेहनती व होतकर मुले / मुली पार्सल डिलेव्हरीसाठी

• पाहिजेत •

- कमवा १५ ते ३० हजार
- टु-व्हीलर आवश्यक
- Weekly Payout

गेट नं.१४/२ ए, शिरसाठमळा, गंगा लॉन, भगवानबाबा चौक, सावेडी, अ.नगर
9921633738
7276747594

पाहिजेत

‘महालक्ष्मी सारीज’ या दालनाकरिता महिला/पुरुष सेल्समन नेमणे आहेत.
अनुभवी उमेदवारास प्राधान्य. | आकर्षक पगार+इन्सेनटिव्ह

संपर्क : **महालक्ष्मी सारीज**
छत्रपती संभाजी पार्क, झेंडा चौकाजवळ, लिंक रोड, केडगाव, अ.नगर
समक्ष भेटा : वेळ : दु. ४ ते सायं.७ वा. **9850221514**

गुरुपौर्णिमा महोत्सव

रविवार, २१ जुलै २०२४ • सायं ५.३० वाजता

स्थळ : श्री मार्कंडेय संकुल, नेप्ती नाका, अहिल्यानगर

९०२८७ १८१५२

व्याख्यान : साधनेद्वारे आनंद अन् रामराज्य
लघुपट, स्वसंरक्षण प्रात्यक्षिके अन् प्रदर्शने

हिंदु जनजागृती समिती HinduJagruti.org

सौजन्य : अभिमन्यू राजूमामा जाधव, अहिल्यानगर, म.न.पा.

आता वजन कमी करणे किंवा वाढवणे झाले सोपे तुमच्या घरातून दररोज व्यायाम करा.
यासाठी मोफत मार्गदर्शन.

अंबादास इंगळे
Ex Army Fitness Expert
मो. 8888352220
8888362220

बाई पाहिजे

१२/२४ तास लहान बाळ सांभाळण्यासाठी मुलगी/बाई पाहिजे
(वयोमर्यादा १८ ते ४०)

– संपर्क –
8888576576

डिजीटल मार्केटिंग एजन्सीसाठी

पाहिजेत

डिजीटल मार्केटिंग (इंटर्न)	स्त्री / पुरुष	१ जागा
कस्टमर सेल्स एक्झिक्युटिव्ह	स्त्री / पुरुष	१ जागा
ग्राफिक्स डिझायनर (Coral Draw, Photoshop)	स्त्री / पुरुष	२ जागा
व्हिडिओ एडीटर (After Effect, Premiere Pro)	स्त्री / पुरुष	२ जागा
व्हिडिओ ग्राफर (मोबाईल रील शूट)	स्त्री / पुरुष	१ जागा
कॉन्टेंट क्रिएटर (फ्रीलांसर / फुल टाईम)	स्त्री / पुरुष	४ जागा

◆ किमान २-३ वर्षे संबधीत क्षेत्रात काम केल्याचा अनुभव आवश्यक ◆ उत्कृष्ट पगार आणि इन्सेंटीव्ह

मुलाखतीची तारीख: १९ ते २३ जुलै २०२४ वेळ: दुपारी ११ ते सायं. ४

OSTWAL DIGITAL
ओस्तवाल डिजीटल
एक्सेल आर्केड, पहिला मजला, HDFC बँक जवळ, सर्जेपुरा रोड, अहमदनगर
आपला CV मेल करा ostwaldigital@gmail.com
किंवा व्हाटसअॅप करा ++91-8055-116655

वैद्यकिय/अर्थ वैद्यकिय तांत्रिक व्यवसायिक शिक्षणाची कास धरा... बेरोजगारीवर मात करा...
शासकिय नोकरीची पात्रता व हमी असलेले शासकिय मान्यता प्राप्त कोर्सेस

दर्जेदार शिक्षण **प्रवेश सूचना** दर्जेदार नोकरी

शासकिय नोकरीची पात्रता व हमी असलेले शासनमान्य कोर्ससाठी प्रवेश सुरु

MEDICAL LAB TECHNICIAN (DMLT)

कालावधी : २ वर्ष • पात्रता : १० वी, १२ वी (पास/नापास)

नगर/महानगरपालिका, जिल्हा परिषदेचे प्राथमिक आरोग्य केंद्र, शासकिय ग्रामीण/जिल्हा रुग्णालय, निमशासकिय, खाजगी, सुपर स्पेशालिटी, मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व पॅथॉलॉजी लॅब मध्ये तसेच ब्लड बँक, म्युनिसिपल वॉटर टेस्टींग लॅबोरेटरी, फार्मास्युटीकल, डेअरी इंडस्ट्रीज व विविध मेडिकल कॉलेजेस, लस इन्टेसिरा, डायग्नोस्टिक लॅब, फार्मसी कॉलेज व फॉरेन्सिक लॅब मध्ये टेक्निशियन म्हणून नोकरी मिळण्याची सुवर्णसंधी. संपूर्ण महाराष्ट्रातील अनेक शासकिय व निमशासकिय रुग्णालयामध्ये या अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांना लॅब टेक्निशियन पदासाठी (स्के.९३००-३४८०० ग्रेड पे ५६००) भरती प्रक्रिया झाली आहे.

RADIOLOGY TECHNICIAN (१२ वी सायन्स समकक्ष)

(X-Ray/ECG/CT Scan/M.R.I./Sonography/Cath Lab/Dialysis)

कालावधी : २ वर्ष • पात्रता : १० वी, १२ वी (पास/नापास)

नगर/महानगरपालिका, जिल्हा परिषदेचे प्राथमिक आरोग्य केंद्र, शासकिय ग्रामीण/जिल्हा रुग्णालय, निमशासकिय, खाजगी, सुपर स्पेशालिटी, मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये नोकरी मिळण्याची सुवर्णसंधी तसेच एक्स-रे फिल्म बनविणाऱ्या कंपनी मध्ये किंवा एक्स-रे साठी लागणारे केमिकल्सच्या कंपनीमध्ये जॉब करु शकता. स्वतःचा व्यवसाय सुरु करु शकता. संपूर्ण महाराष्ट्रातील अनेक शासकिय व निमशासकिय रुग्णालयामध्ये हा अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांना एक्स-रे टेक्निशियन पदासाठी (स्के.९३००-३४८०० ग्रेड पे ५६००) भरती प्रक्रिया झाली आहे.

बयाची अट नाही... त्वरा करा... मर्यादित जागा...

शासकिय अप्रेंटीसशिप, महाराष्ट्र शासनाचे Paramedical Council मध्ये रजिस्ट्रेशन करता येते. वरील कोर्सेस उत्तीर्ण झाल्यार १२ वी विज्ञानाची समकक्ष त्यामुळे १० वी व १२ वी चा २ वर्ष व खर्च वाचतो

२८ वर्षांची यशस्वी शैक्षणिक परंपरा असलेले सुसज्ज कॉलेज

J.J.M.F. JIVAN JYOT MEDICAL FOUNDATION
बॉम्बे हॉस्पिटल/बेकर्स समोर, वन विभाग कार्यालय मागे, नगर-औरंगाबाद रोड, अहमदनगर. मो. 8830685732
Visit us : www.jjmf.info | Email : jjmf@rediffmail.com

उपरोक्त सर्व पदांसाठी मागणी जास्त व उमेदवार कमी असल्यामुळे नोकरीची १००% संधी

PUBLIC DISCLOSURE

I lost a black leather bag which was containing my class 10th marksheet and passing certificate. While traveling by the bus from pune to ahmednagar at ahmednagar bus stand

Name :- Sairaj Ram Karande
School :- Colonel Parab's School - a gurukul Ahmednagar.
Index NO:- 1222756/014
Year of passing :- 2022 / **Police station FRI No- 919/2024**

If anyone happens to find the bag, please contact me at 9209005977

टेस्टी फरसाण, ते म्हणजे फक्त ‘राज’च..!

Raj's
Namkeen & Wafers
राज नमकीन

राज नमकीन

आमचे पदार्थ : फरसाण, मसाला शेव, भडंग, मिसळ फरसाण, नायलॉन चिवडा व इतर बरंच काही...

पत्ता : केडगाव,अहमदनगर
होलसेलसाठी संपर्क : 8275388325

डॉ.अद्वैत गिते

MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन

- ✲ चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
- ✲ पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
- ✲ डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस

यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.

- ✲ सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
- ✲ सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

॥ कुलस्वामिनी प्रसन्न ॥

शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस

नगर–पुणे–नगर
आता आपल्या शहरातुन

दररोज
- नगर येथून स. ७,८,९ व दुपारी २.००
- पुणे येथून स.११,१२,२ व सायं.५ वा

Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स

पिकअप पॉईंट –भिस्तबाग चौक, झोपडी कॅन्टीन, तारकपूर, दिल्लीगेट, राज पॅलेस चौक, कायनेटिक चौक, केडगाव
पुणे ड्रॉप– वाघोली, खराडी बायपास, येरवडा, नवीन शिवाजीनगर बसस्टॅण्ड. बुकिंग आवश्यक

अमर-प्रेम हॉलिडेज्
ऑफिस– चितळेरोड,अ.नगर
9657746555/ 9226399555

मोफत मसाज व स्टिम बाथ

(तेलाचे पैसे द्यावे लागतील)

8928344445

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

दिनांक : 12 ते 19 जुलै 2024

कल्की	(2D)	9.00 AM, 3.30 PM, 10.15 PM
	(3D)	12.00 PM, 7.15 PM
सरफिरा		7.30 AM, 10.30 AM, 4.15 PM 7.15 PM, 10.45 PM
हिन्दुस्तानी २		9.00 AM, 3.30 PM 9.45 PM
रांगडा	(मराठी)	12.30 PM
बाई गं	(मराठी)	1.30 PM, 7.00 PM

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahmednagar’s First & Most Luxurious Cinematic Paradise !

AVAILABLE ON bookmyshow **CONNPLEX** SMART THEATRE AVAILABLE ON bookmyshow

3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

चुकीची दुरुस्तीची नोटीस

दैनिक नवा मराठाच्या शनिवार **दि.१६/०७/२०२४** रोजीच्या **पान क्र.८** वर **अॅड.समीर वखारे** यांच्या नोटिसीमध्ये **कलम ५** मधील मिळकत **स्टिल्ट थर्ड फ्लोअरवरील फ्लॅट नं.३०४** असे चुकून छापून आलेले आहे. त्याऐवजी **स्टिल्ट थर्ड फ्लोअरवरील फ्लॅट नं.४०४** असे वाचण्यात यावे.

फक्त 15 मिनिटात
सोने तारण कर्ज

9% व्याजदर

शुन्य टक्के प्रोसेसिंग फी
प्रति तोळा **₹ 58000**

र.जि.नं. ए.एन.आर./आर.एस.आर./सी.आर/१७६६/१८
लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्या.
अधिक माहितीसाठी संपर्क :
78882 19471, 94231 67850
बागडपट्टी, अहमदनगर

---

१० वे पुण्यस्मरण

दिले सदा ओंजळ भरुनी,
कमी कुठे ना राहिली,
आपला सहवास होता,
ग्रीष्मातही सावली,
चरणी लीन होवो माथा आमुचा,
नको कोणती आसक्ती,
मनाच्या गाभाऱ्यात वसावी
सदैव आपली दिव्य मुर्ती..

१० व्या स्मृतीदिनी
आमची भावपूर्ण श्रध्दांजली

स्व. मुळचंदजी लालचंदजी गांधी

स्व. दि. १९/०७/२०१४ (आदर्श शिक्षक)

✲ दुःखांकित ✲

सौ.आशा जयकुमार गांधी	जयकुमार मुळचंद गांधी
सौ. आशा दिलीप गांधी	दिलीप मुळचंद गांधी

बेबीताई पनालाल शिंगवी । सौ.शैलजा दिलीप फिरोदिया
सौ.अलका संजय खिंवसरा

डॉ. सौ. हर्षिता निखिल गांधी (MBBS. MD. DNB (Micro.)	डॉ. निखिल जयकुमार गांधी (MBBS. Ms. (Ortho)
डॉ.सौ.आचल रिषभ गांधी (MBBS. MD. Anesthesi)	डॉ.रिषभ दिलीप गांधी (MBBS. MS. Gen.Surjery)
सौ.कल्पना विजय मेहेर	श्री.विजय मेहेर (आष्टी)
सौ. कुमुदिनी किशोर शिंगवी	किशोर पनालाल शिंगवी (B.Pharm)
सौ. प्रिया प्रशांत शिंगवी	प्रशांत पनालाल शिंगवी (BE.Eng)
सौ.नितल आनंद फिरोदिया	डॉ.आनंद दिलीप फिरोदिया (phD)
डॉ. अपूर्वा अक्षय फिरोदिया (MBBS MS Gynac)	डॉ. अक्षय दिलीप फिरोदिया MBBS/DNB (Med)
डॉ. सौ. किरण स्वप्निल खिवंसरा (MDS)	डॉ. स्वप्निल संजय खिवंसरा (MDS)
डॉ.प्राची शुभम खिंवसरा (MBBS, MD CAX)	डॉ. शुभम संजय खिंवसरा (MBBS, MD, DM, ONCO)
डॉ.सौ. स्वीटी श्रीपाल ओसवाल (B.D.S)	डॉ. श्रीपाल ओसवाल (M.D.S)
डॉ. हर्षल जयकुमार गांधी (MBBS, MD. Chest)	डॉ. ऋतिक दिलीप गांधी (MBBS)

रुद्राक्ष निखिल गांधी

फर्म : ✲ गुरुदेव मेडिकल अॅण्ड जनरल स्टोअर्स, आनंदऋषिजी हॉस्पिटल समोर, माणिकनगर, अ.नगर. मो. ९९२२६०७९८९
✲ पशुधन मेडिकल : अंबरप्लाझा, बसस्टॅण्ड समोर, अ.नगर. मो. ९८२२७८५८२१
✲ गुरुदेव स्पेशालिटी क्लिनिक अॅण्ड ऑर्थोकेअर

समस्त गांधी, खिंवसरा, शिंगवी, फिरोदिया परिवार

जाहीर नोटीस

दि. :- १८/०७/२०२४

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलाबरोबर ठरलेला असुन, विसार दिलेला आहे. सदर मिळकतीवर भाईचंद हिराचंद रायसोनी को ऑप क्रे सो लि या बँकेचा बोजा आहे. असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

१) मिळकत वर्णन : जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील **मौजे केडगाव** येथील खालील वर्णनाचे खुले प्लॉटस –

सर्व्हे नंबर- ३०३/४ पैकी मधील प्लॉट खालीलप्रमाणे-

प्लॉट नं.	क्षेत्रफळ चौ.मीटर	चतु:सिमा			
		पुर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
३७	२५६.८८	प्लॉट नंबर ३८	१२.०० मी रोड	९.०० मी रोड	प्लॉट नं. ३६

सर्व्हे नंबर- ३०३/३ पैकी मधील प्लॉट खालीलप्रमाणे-

प्लॉट नं.	क्षेत्रफळ चौ.मीटर	चतु:सिमा			
		पुर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
१४	१९७.२५	प्लॉट नं. ३७	प्लॉट नं. १५	९ मी रोड	१२.०० मी रोड
१६	१७०.००	प्लॉट नं. ३५	प्लॉट नं. १७	९ मी रोड	प्लॉट नं. १५
१८	१७०.००	प्लॉट नं. ३३	प्लॉट नं. १९	९ मी रोड	प्लॉट नं. १७
२६	२९२.२०	९ मी रोड	१२.०० मी रोड	प्लॉट नं. २५	प्लॉट नं. २७
२७	१७०.००	९ मी रोड	प्लॉट नं. २६	प्लॉट नं. २४	प्लॉट नं. २८
२८	१७०.००	९ मी रोड	प्लॉट नं. २७	प्लॉट नं. २३	प्लॉट नं. २९
२९	१७०.००	९ मी रोड	प्लॉट नं. २८	प्लॉट नं. २२	प्लॉट नं. ३०
३०	१७०.००	९ मी रोड	प्लॉट नं. २९	प्लॉट नं. २१	प्लॉट नं. ३१
३१	१७०.००	९ मी रोड	प्लॉट नं. ३०	प्लॉट नं. २०	प्लॉट नं. ३२
३२	१७०.००	९ मी रोड	प्लॉट नं. ३१	प्लॉट नं. १९	प्लॉट नं. ३३
३३	१७०.००	९ मी रोड	प्लॉट नं. ३२	प्लॉट नं. १८	प्लॉट नं. ३४
३६	१७०.००	९ मी रोड	प्लॉट नं. ३५	प्लॉट नं. १५	प्लॉट नं. ३७
३७	१९७.२५	९ मी रोड	प्लॉट नं. ३६	प्लॉट नं. १४	१२.०० मी रोड

सदर मिळकतीचे विद्यमान मालक :-
श्री. निर्मल शरद मुथा
अहमदनगर.

अॅड. ज्ञानेश्वर राधाकिसन पाडेकर
ऑफीस :– बालाजी कॉलनी, केडगाव, अहमदनगर
मो.नं. ९८५०४०४६६१

‘‘स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद’’ – कर्मवीर
रयत शिक्षण संस्थेचे

श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय (विज्ञान)

अकोळनेर, ता. नगर, जि. अहमदनगर
संस्थापक– पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील (डी. लिट)
E-mail id:-akolner.scsmvnrgmail.com फोन नंबर:– ०२४१ २५९५७४०

माध्यमिक शाळा मान्यता: बी ४ दि:२/३/१९६०. उच्च माध्य. शाळा मान्यता: शिउसं/ उमाशि–१ /स्वयं अशाळा मान्यता/पुवि/२०१६/१९४१८ दि:– १७/९/२०१६. स्थापना:– १९५९. एस.एस.सी.क्र :– १२.०५.०१५. एच.एस.सी.क्र :– जे १२.०५.०६६

– : टेंडर नोटीस:–

लेबर कॉन्ट्रक्टर व मटेरियल सप्लायर नेमणेबाबत.

जावक क्र. :– समक्ष/२०२४–२५ दिनांक:– १८/७/२०२४

आमच्या विद्यालयाच्या नवीन संरक्षक भिंतीचे (३९४ र. फुट लांबी) बांधकाम करण्यासाठी अनुभवी लेबर कॉन्ट्रॅक्टरकडून खोदाई करणे, आर.सी.सी. बांधकाम, प्लास्टर इत्यादी सर्व सिव्हील कामे करणे यासाठी कोटेशन बंद लिफाफ्यामध्ये श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, अकोळनेर ता. जि. अहमदनगर यांचे कार्यालयात किंवा ओम साई कन्सल्टंटस् आर्किटेक्टस् इंजिनिअर्स, १/२, गोवर्धन अपार्टमेंट आंबेडकर रोड, अहमदनगर यांचे कार्यालयात दि. १९.७.२०२४ ते दि. २७.७.२०२४ पर्यंत रु. ५००/– भरुन मिळतील व भरलेले टेंडर फॉर्म दि. ३०.७. २०२४ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, अकोळनेर ता. जि. अहमदनगर यांचे ऑफिसमध्ये स्विकारण्यात येतील. टेंडर जमा करताना त्यासोबत रु. ३००० /– बयाना रक्कम भरावी लागेल वरील काम पुर्ण करण्याचा कालावधी दोन महिने राहिल.

१) बांधकामासाठी लागणारे मटेरियअल उदा :– वाळू, खडी, सिमेंट, स्टिल, विटा, पाणी विद्यालय पुरविणार आहे.
२) बांधकामासाठी लागणारे मटेरिअल उदा :– वाळू, सिमेंट, स्टिल, विटा, खडी, इत्यादीचे रेट बंद पाकिटामध्ये द्यावेत.
३) कोणतेही टेंडर मंजूर करणे अथवा कारण न देता सर्व टेंडर नाकारणे या बाबत सर्व अधिकार रयत शिक्षण संस्थेने राखुन ठेवले आहेत.

मुख्याध्यापक, रयत शिक्षण संस्थेचे,
छत्रपती शिवाजी विद्यालय, अकोळनेर
ता. जि. अहमदनगर. मोबाईल नंबर – ९८९०८७८७६६